www.yuvakadhar.in E mail - dainikyuvakaadhar@gmail.com facebook : yuvakadhar

तरुणांचा बुलंद आवाज

# दैनिक युवक आधार मराठी

दैं. युवक आधार करीता प्रतिनिधी नेमने आहे.
मुंबई, ठाणे नाशिक, रायगड , आलिबाग खोपोली ,पुणे , सांगली , सातारा ,कोल्हापुर, अहमदनगर, औरंगाबाद, बीड, नांदेड, शहर प्रतिनिधी नेमने आहे.
9220403509 संपर्क 9594509661
श्री.संतोष शिवदास आमले | श्री. सुरेश आत्माराम भोईर

मुख्य संपादक - सौ भारती संतोष आमले उपसंपादक - श्री.विलास मनोहर गायकवाड कार्यकारी संपादक - श्री.सुरेश आत्माराम भोईर निवासी संपादक - श्री. राकेश जनार्दन पाटील सह संपादक : मुकुंद कांबळे

वर्ष : २ अंक : 261 वा शुक्रवार दि. 06 जून २०२५ किंमत : ४ रु पृष्ठ : ४ RNI MAHMAR/2023/89514


## पाकिस्तानसाठी हेरगिरी! ज्योती मल्होत्रानंतर युट्यूबर जसबीर सिंगला अटक, पोलिसांची मोठी कारवाई

पंजाब पोलिसांच्या विशेष पोलीस पथकाने पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या प्रकरणात एका युट्यूबरला अटक केली आहे. जसबीर सिंग असे या युट्यूबरचे नाव असून, तो पाकिस्तान प्रणित हेरगिरी नेटवर्कमध्ये सहभागी असल्याचे तपासातून समोर आले आहे. तो जानमहल नावाचे युट्यूब चॅनेल चालवतो. राज्य विशेष मोहीम विभागाच्या पथकाने मोहालीतून जसबीर सिंगला अटक केली. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार आरोपी जसबीर सिंग हा थेट पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेतील अधिकाऱ्यांच्या संपर्कात होता.

**जसबीरने कोणत्या अधिकाऱ्याला दिली माहिती ?**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेतील अधिकारी शाकीर ऊर्फ जट्ट रंधावा याच्या संपर्कात होता. तो आयएसआयचा पाठिंबा




असलेल्या दहशतवाद्यांशी संबंधित हेरगिरी नेटवर्कमध्येही सहभागी आहे. जसबीर सिंग याने पाकिस्तानी गुप्तचर यंत्रणेच्या अधिकाऱ्याला भारतीय सुरक्षा दलाबद्दल संवेदनशील माहिती दिली, असे अधिकाऱ्यांनी सांगितले.

**कोण आहे जसबीर सिंग ?**

४१ वर्षीय जसबीर सिंग हा युट्यूब चॅनेल चालवतो. तो पंजाबमधील रोपर जिल्ह्यात असलेल्या महलान गावाचा आहे. तो सध्या रुपानगरमध्ये राहतो. त्यांच्या युट्यूबवरील फोटोवर माझा शेतकऱ्यांना पाठिंबा असा हॅशटॅग आहे.

वाचा >>धक्कादायक ! मुंबईपासून अवघ्या ६० किमी अंतरावरील गाव बनलं होतं 'इस्लामिक स्टेट लिबरेट झोन'; पुन्हा चर्चेत

जसबीर सिंग १.१ मिलियन सबस्क्रायबर असलेले जानमहल व्हिडीओ हे चॅनेल चालवतो. या चॅनेलवर तो मुख्यतः पर्यटनाबद्दलचे व्हिडीओ टाकतो. त्याने मलेशिया, मालदीव, थायलंड आणि इतर देशातील भटकंतीचे व्हिडीओ टाकलेले आहेत.

जसबीर सिंगचे इन्स्टाग्रामवर ४२००० फॉलोअर्स आहेत. इन्स्टाग्रामवरील बायोमध्ये त्याने फूड व्लॉगर असे लिहिलेले आहे. त्याने दोन दिवसांपूर्वी शेवटची पोस्ट अपलोड केलेली आहे. त्याचा मुलगा मुंबई इंडियन्स विरूद्धच्या सामन्यात पंजाबचा विजय झाल्याचा आनंद व्यक्त करतानाचा हा व्हिडीओ आहे.

**ज्योती मल्होत्रासोबत संपर्क**

पंजाबचे पोलीस महासंचालक गौरव यादव यांनी जसबीर सिंगला अटक झाल्याच्या वृत्ताला दुजोरा दिला आहे. जसबीर सिंग ज्योती मल्होत्रासोबतही संपर्कात होता, असेही त्यांनी सांगितले. ज्योती मल्होत्राला १५ मे २०२५ रोजी पाकिस्तानसाठी हेरगिरी केल्याच्या प्रकरणात अटक झालेली आहे.

## दृष्य सत्य

### जनतेच्या नजरेतून शासनाच्या दरबारात

"स्वच्छतागृह स्वच्छ ठेवा, आरोग्य सुरक्षित ठेवा"संदेशाचा ग्रामपंचायत आसडी (ता.सिल्लोड) ला विसर.



दैनिक युवक आधार प्रतिनिधी :- योगेश पालोदकर

**ग्रामपंचायत स्वच्छतागृहाच्या अस्वच्छ दुर्गंधीमुळे लोक हैराण, ग्रामपंचायतीने तातडीने साफसफाई करावी नागरिकांची मागणी.**

## पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त स्वच्छता मोहीम, गोशाळा भेट आणि महाआरती

दैनिक युवक आधार
पनवेल (प्रतिनिधी
) पुण्यश्लोक राजमाता अहिल्यादेवी होळकर यांच्या ३००व्या जयंतीनिमित्त भारतीय जनता पक्ष पनवेल तालुका ग्रामीण उत्तर मंडलाच्या वतीने एक भक्तिपूर्ण आणि सामाजिक उपक्रमाचे आयोजन करण्यात आले. पेंधर फाटा येथील शिवमंदिर परिसरात स्वच्छता मोहीम राबविण्यात आली, त्यानंतर जवळील गोशाळेला भेट देण्यात आली आणि समारोप महाआरतीने करण्यात आला. लोकप्रिय आमदार प्रशांत ठाकूर, भाजपचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष अविनाश कोळी यांच्या मार्गदर्शनाखाली झालेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून माजी जिल्हा सरचिटणीस प्रल्हाद केणी उपस्थित होते. कार्यक्रमाचे नेतृत्व भाजप उत्तर मंडल अध्यक्ष दिनेश खानावकर यांनी केले.कार्यक्रमात ज्येष्ठ नेते कृष्णा पाटील, युवा नेते विनोद घरत, किरण दाभणे, नितीन भोईर, भास्कर आगलावे, बाळकृष्ण पाटील, विशाल खानावकर, आशिष कडू, अंकुश पाटील, समीर गोंधळी, आकाश फडके, पवन भोईर, शुभम खानावकर, विनीत खानावकर, करण फडके तसेच भाजप कार्यकर्ते आणि स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. या उपक्रमाद्वारे सामाजिक स्वच्छतेचा संदेश देण्याबरोबरच जनतेमध्ये धार्मिक व सांस्कृतिक जाणीवा जागृत करण्याचा प्रयत्न करण्यात आला. राजमाता अहिल्यादेवी होळकर यांचे कार्य आणि त्याग आजही प्रेरणादायी आहे. त्यांच्या स्मरणार्थ अशा प्रकारचे उपक्रम आयोजित करून त्यांच्या विचारांचा प्रसार करण्याचा हेतू या माध्यमातून साध्य करण्यात आला. कार्यक्रमाची सांगता सामूहिक महाआरतीने करण्यात आली.








## एक पेड मॉ के नाम” उपक्रमांतर्गत वृक्षारोपण: आईला समर्पित हिरवा प्रण

**आसाराम विरकर, उपसंपादक,**
**दैनिक युवक आधार**

जागतिक पर्यावरण दिनानिमित्त आणि पंतप्रधान नरेंद्रजी मोदी यांच्या प्रेरणेने “एक पेड मॉ के नाम” या अभिनव उपक्रमांतर्गत आज वृक्षारोपण करण्यात आले. कॅबिनेट मंत्री नामदार श्री अतुलजी सावे साहेब, भाजपा शहर जिल्हाध्यक्ष मा. किशोरजी शितोळे यांच्या प्रमुख उपस्थितीत या उपक्रमाला उत्साहवर्धक प्रतिसाद मिळाला. या कार्यक्रमात गारखेडा मंडळ अध्यक्ष श्री संजय भाऊ बोराडे, श्री शिवाजी दांडगे, श्री लक्ष्मीकांत थेटे, सौ. माधुरीताई अद्वंत, श्री दामू अण्णा शिंदे, श्री बालाजी मुंडे यांसह अनेक कार्यकर्ते, पदाधिकारी आणि नागरिकांनी हिरवळ वाढवण्यासाठी आपल्या सहभागाची नोंद केली. आईच्या नावे केलेले हे वृक्षारोपण निसर्गाची सेवा आणि मातृप्रेम व्यक्त करणारा संदेश देणारा ठरला. सर्वांनी मिळून या उपक्रमात सक्रिय सहभाग नोंदवावा, हीच अपेक्षा!




## कळंबोली येथे गोपीनाथ मुंडे यांची पुण्यतिथी विविध उपक्रमाने साजरी

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर**

: 3 जून रोजी गोपीनाथ मुंडे यांचा अकरावा स्मृतिदिन भावपूर्ण वातावरणात साजरा करण्यात आला. स्वामी समर्थ मंदिर सेक्टर 4 येथे जय भगवान युवा प्रतिष्ठान यांच्यावतीने सकाळी ११ ते ४ या वेळेत रक्तदान शिबिर आयोजित करण्यात आले होते . कामोठ्यामधील स्वस्तिक ब्लड बँक यांनी यामध्ये सहभाग घेऊन अनेक रक्तदात्यांनी रक्तदान केले . या रक्तदान शिबिरास पनवेलचे आमदार प्रशांत ठाकूर यांनी उपस्थित राहून रक्तदात्यांचा उत्साह वाढवला. यावेळी उत्तर रायगड जिल्हा सरचिटणीस नितीन पाटील , युवा मोर्चा उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष मयुरेश नेतकर , कळंबोलीचे माजी शहराध्यक्ष रवीनाथ पाटील, माजी नगरसेवक बबन मुकादम, सहकार सेलचे जिल्हाध्यक्ष अशोक मोटे भाजपा नेते सित्तु शर्मा, भटके विमुक्त आघाडीचे उत्तर रायगड जिल्हाध्यक्ष बबन बारगजे व अनेक पदाधिकारी कार्यकर्ते उपस्थित होते . रक्तदान शिबिरानंतर अध्यात्मिक महिला मंडळाचा गीता पठणाचा कार्यक्रम झाला . रात्री सात ते नऊ ह . भ . प . आदिनाथ महाराज लाड शास्त्री आळंदी देवाची यांचे सुंदर व सुश्राव्य किर्तन झाले . या कीर्तनामध्ये महाराजांनी मुंडे यांच्या आठवणी आणि त्यांचा प्रवास श्रोत्यांसमोर मांडला . या कार्यक्रमास कोकण म्हाडाचे माजी सभापती माजी बाळासाहेब पाटील कळंबोली शहराध्यक्ष अमर पाटील माजी नगरसेवक राजेंद्र शर्मा , देविदास खेडकर इत्यादी मंडळींनी हजेरी लावली .







## संपादकीय

# ६ जुन शिवराज्याभिषेक दिवस

**विषय:-** शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने संपूर्ण गडकिल्ल्यांची जोपासना सरकारने करावी. छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक ६ जून १६७४ ला झाला.त्या निमित्ताने दरवर्षी ६ जूनला शिवराज्याभिषेक सोहळा मोठ्या उत्साहाने साजरा करण्यात येतो.छत्रपती शिवाजी महाराजांचा ३५१ वा राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने राजकीय पुढाऱ्यांनी काही तरी शिकवन घेतली पाहिजे. आज महाराष्ट्राच्या गौरवशाली इतिहासाचे सर्वेसर्वा म्हणजे छत्रपती शिवाजी महाराजच.राज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्ताने राज्यात वाढता अत्याचार,भ्रष्टाचार, महागाई, बेरोजगारी,गरीबी यावर अंकुश लावण्यासाठी सरकारने सर्वोतोपरी प्रयत्न केले पाहिजे.त्याचबरोबर शिवरायांचे ब्रिदवाक्य लक्षात ठेवले पाहिजे ते म्हणजे "भुकेलेल्यांना अन्न व प्रजेची सेवा" यापध्दतीने सरकारची वाटचाल असायला पाहिजे.यातुनच आपल्याला शिवाजी महाराजांचे खरे दर्शन घडुन येईल.शिवरायांचे स्वप्न साकार करण्यासाठी सरकारने संपूर्ण गडकिल्ल्यांची जोपासना करावी. महाराजांनी रयतेच्या जीवांसाठी मोगलांशी दोन-दोन हात केले तेव्हाच हिंदवी स्वराज्याची स्थापना झाली.त्यामुळे सरकारने व राजकीय पुढाऱ्यांनी शिवाजी महाराजांचे आदर्श सामोरं ठेवुन जनतेच्या सुख-दुःखात सहभागी व्हायला पाहिजे. १९ फेब्रुवारी १६३० साली शिवाजी महाराजांचा जन्म झाला.त्यामुळे दरवर्षी शिवजयंती १९ फेब्रुवारीला साजरी केली जाते. त्याचप्रमाणे इतर संभाव्य तारखांमध्ये ६ एप्रिल १६२७ (वैशाख शुद्ध तृतीया) ही सुद्धा जन्म तारीख मानली जाते. त्यानुसार महाराष्ट्राबाहेर अनेक लोक शिवजयंतीचा दिवस म्हणून वैशाख शुद्ध तृतीया हा दिवस मानतात.महाराष्ट्रात शिवजयंतीच्या तारखेला महत्व नसुन त्यांचे कर्तुत्व,त्यांचा त्याग,रयतेची जबाबदारी आणि लाखोंनी सैन्य घेऊन चढाई करणाऱ्या मोगल साम्राज्याचा अंत करणे हे महत्वाचे होते.ज्याप्रमाणे शिवजयंती घराघरात साजरी केली जाते त्याचप्रमाणे "राज्याभिषेक सोहळा"घराघरात साजरा व्हायला पाहिजे. शिवाजी महाराजांची जन्मतारीख किंवा राज्याभिषेकची तारीख याला महत्व न देता शिवाजी महाराज आपल्या अंतःकरणात व हृदयात कसे बसेल याकडे सर्वांनीच लक्ष देण्याची गरज आहे. आजच्या परीस्थितीत शिवाजी महाराजांचे आचरन अंगीकारतांना जनतेच्या सेवेला व समस्यांना महत्व देण्याची गरज आहे.यातच आपल्याला खरा श्री छत्रपती शिवाजी महाराजांचा राज्याभिषेक सोहळा दिसून येईल. शिवाजी महाराजांइतकी सेवा कोणीही करू शकत नाही.परंतु खासकरून राज्यकर्ते व राजकीय पुढाऱ्यांना मी सांगू इच्छितो की जनतेच्या समस्या,भुकेलेल्यांना अन्न, रोजगार याकडे जरी लक्ष दिले तर शिवाजी महाराजांचे स्वप्न अवश्य साकार होईल असे मला वाटते.जोपर्यंत सुर्य-चंद्र, आकार-पाताळ आहे तोपर्यंत शिवाजी महाराजांचा जयजयकार घराघरात व सर्वांच्या हृदयात आपल्याला दिसुन येईल.मी तर म्हणेल की शिवजयंती किंवा राज्याभिषेक सोहळा रोज साजरा व्हावा आणि शिवाजी महाराजांचे गोडवे जनतेपर्यंत पोहचवावे. तेव्हाच भारतात एकच नाही तर लाख शिवाजी तयार होतील. कारण सर्वांनाच कल्पना आहे की एक मावळा हजार मोगलांवर भारी पडत असे तेव्हाच संपूर्ण गडकिल्ले शिवाजी महाराजांना जिंकता आले.कारण त्याकाळी मोगलांना प्रत्येक मावळा शिवाजी वाटत असे यामुळेच मोगल छत्रपती शिवाजी महाराजांपासुन भयभीत होते. शिवाजी महाराजांच्या पुण्यांयीनेच आज आपण ताठ मानाने,स्वाभिमानाने जगत आहोत व मोकळा श्वास घेत आहोत.शिवाजी महाराजांनी गनीमीकाव्याने मोगलायीचा व मोगल साम्राज्याचा अंत केला व हिंदवी स्वराज्याची स्थापना केली.त्यामुळे मोठ्या थाटात व उत्साहाने शिवराज्याभिषेक सोहळा साजरा केला जातो.याचा गर्व महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे.आज भारताची गौरव गाथा जी आपण ऐकतो व पहातो त्याचे संपूर्ण श्रेय शिवरायांनाच आहे.शिवाजी महाराज म्हणजे महाराष्ट्रासह संपूर्ण भारताची अबाध्य शक्ती आहे.शिवराज्याभिषेकच्या निमित्ताने शिवाजी महाराजांचे विचार समाजातील प्रत्येक व्यक्तीपर्यंत पोहचले पाहिजे.जानता राजा, रयतेचा राजा, हिंदवी स्वराज्याचे संस्थापक म्हणून जगभर ख्याती प्राप्त आहे.त्यामुळे केवळ महाराष्ट्रातच किंवा भारतातच नव्हे तर संपूर्ण जगभरात शिवाजी महाराजांचे नाव आदराने घेतले जाते.तत्वज्ञ, इतिहासकार शिवाजी महाराजांवर अभ्यास करण्यासाठी भारतात येतात.१९ फेब्रुवारी रोजी सुमारे १११ पेक्षा अधिक देशांमध्ये शिवाजी महाराजांची जयंती साजरी करण्यात येते.असे सांगण्यात येते की शिवाजी महाराजांकडे अनेक जातीवंत घोडे सुध्दा होते.कोणत्या घोड्यांचा वापर केव्हा करायचा हे त्यांना चांगलेच अवगत होते.शिवाजी महाराजांकडे मोती, विश्वास,तुरंगी, इंद्रायणी, गाजर, रणभीर, कृष्णा असे ७ घोडे होते.शिवाजी महाराजांनी हिंदवी स्वराज्याची स्थापना करतांना सुमारे ४०० गड किल्ले आपल्या अधिपत्याखाली आणले होते.काही गड त्यांनी स्वतः बांधले तर काही किल्ले लढाया करून जिंकले. महाराजांचा एक गडकिल्ला म्हणजे स्थापत्यशास्त्र, व्यवस्थापन आणि गनिमी काव्याचे प्रतिकच होते. त्यामुळे मी सरकारला आग्र करतो की महाराष्ट्रातील संपूर्ण गडकिल्ल्यांची देखरेख करून सुसज्जीत केले पाहिजे. यातुनच शिवरायांना खरा मानाचा मुजरा ठरेल. कारण गडकिल्ले महाराष्ट्राची आण-बाण-शान आहे. त्याचप्रमाणे महाराष्ट्रासह संपूर्ण भारतातील गडकिल्ले ही भारताची धरोहर आहे.कारण गडकिल्ल्यामुळेच शिवरायांच्या आठवणी पुन्हा-पुन्हा जागृत होतात व नवीन उर्जा निर्माण होते.गडकिल्यांची सुरक्षा म्हणजे शिवाजी महाराजांच्या राज्याभिषेकाच्या निमित्ताने महाराजांना खरे अभिवादन व मानवंदना ठरेल.कारण शिवरायांनी मुठभर मावळ्यांच्या साक्षीने हिंदवी स्वराज्याची स्थापना केली व संपूर्ण किल्ले काबीज केले हा अभिमान महाराष्ट्रासह संपूर्ण भारताला आहे.त्यामुळे इतिहास जागृत ठेवण्यासाठी संपूर्ण किल्ले पर्यटनाच्या दृष्टीने व शिवरायांची आठवण या उद्देशाने किल्ल्यांची जोपासना करणे गरजेचे आहे.कारण शिवाजी महाराज रयतेचे राजा होतेच.परंतु त्यांच्यात दैवी शक्ती सुध्दा होती. आजही कुठल्याही गडकिल्ल्यांवर गेले तर ४ हजार फूट उंचीवर भर उन्हाळ्यात आपल्याला किल्ल्यावर स्वच्छ पाणी प्यायला मिळते. हा संपूर्ण शिवरायांचाच प्रताप आहे.असे सांगण्यात येते की वयाच्या १७ व्या वर्षी शिवरायांनी स्वतः डिझाईन करून रायगड किल्ला बांधल्याचे सांगण्यात येते.आई जगदंबेच्या आशीर्वादाने शिवाजी महाराजांनी आपले संपूर्ण काम फत्ते केले व मावळ्यांमध्ये उर्जा निर्माण करून मोगलांना भुईसपाट केले.अबझल खानासारख्या महाकाय शक्तीशाली सरदाराला गनीमीकाव्याने यमलोक पोहचवीले. अशाप्रकारे मोगलांच्या संपूर्ण सरदारांना एक-एक करून यमलोक पोहचवीण्याचे काम शिवरायांनी, त्यांच्या सरदारांनी आणि मावळ्यांनी केले.हा देश साधुसंतांचा,थोरमहात्म्यांचा, क्रांतीकारकांचा व हिंदवी स्वराज्याची स्थापना करणाऱ्या शिवरायांचा देश आहे.याची जोपासना महाराष्ट्र व केंद्र सरकारने करावी अशी मी आग्रहाची विनंती करतो. देशात वाढते अत्याचार रोखण्यासाठी, शेतकरी व कामगारांच्या समस्यांचे निवारण करण्यासाठी शिवरायांच्या तत्त्वांच्या अनुकरणाचा वापर करून केंद्र व राज्य सरकारने रयतेच्या सुरक्षेची जबाबदारी स्वीकारावी व महागाईच्या रूपात निर्माण झालेल्या मोगलांचा सर्वनाश करून रयतेला दिलासा द्यावा. यातच खरे शिवराज्याभिषेकाचे महत्त्व दिसून येईल.छत्रपती शिवाजी महाराज यांच्या १४ किल्यांना संयुक्त राष्ट्रसंघाच्या शिक्षण, विज्ञान आणि सांस्कृतिक विभागाने म्हणजे युनेस्कोने आंतरराष्ट्रीय वारसास्थळ (वर्ल्ड हेरिटेज साईट) म्हणुन मान्यता दिली आहे.यामुळे जगात महाराष्ट्राची मान आणखी उंचावली आहे.६ जुन शिवराज्याभिषेक सोहळ्याच्या निमित्याने महाराष्ट्रातील प्रत्येक व्यक्तीने आरोग्याच्या दृष्टीकोनातून,वाढते प्रदूषण व बदलते हवामान लक्षात घेता पर्यावरणाला वाचविण्यासाठी आजच्या दिवसाला मोठ्या प्रमाणात वृक्षलागवड करण्याचा संकल्प सर्वांनीच करावा.यामुळे महाराष्ट्रात हिरवागार गालिचा निर्माण होईल व संपूर्ण गडकिल्ले हिरवेगार दिसतील.शिवरायांना माझा मानाचा मुजरा. जय शिवाजी.
हर हर महादेव.

**लेखक**
**रमेश कृष्णराव लांजेवार**
**( स्वतंत्र पत्रकार )नागपूर.**

# आदर्श पत्रकारितेची प्रेरणा
# समाजमनाच्या आरशात सत्याचा शोध



पत्रकारिता ही केवळ घटनांचे वृत्तांकन करणारी कला नसून, ती समाजाच्या धमन्यांमधून वाहणाऱ्या सत्याच्या प्रवाहाची साक्षीदार असते. आदर्श पत्रकारिता ही शब्दांच्या सोंगट्यांनी समाजाला नाचविणारी नव्हे, तर विवेक आणि तथ्याच्या आधारे समाजाच्या हिताचे मार्गदर्शन करणारी शक्ती असते. आजच्या डिजिटल युगात, सोशल मीडियाच्या गोंगाटात, अफवांची गर्दी होते. लोकसंवादाच्या या गर्दीत, आदर्श पत्रकार हा दिशादर्शक दीपस्तंभासारखा उभा राहतो. तो घटनांना फक्त मांडत नाही; त्या घटनांमागचे प्रश्न, सत्य आणि त्यांच्या परिणामांची चर्चा करतो. आदर्श पत्रकारितेचा पाया म्हणजे निःपक्षपाती वृत्ती आणि समाजहिताचा कटाक्ष. बातमी देताना पत्रकाराने कधीच व्यक्तीगत हितसंबंध, राजकीय दबाव किंवा आर्थिक फायद्यांचा विचार करता कामा नये. सत्याची चौकट असो, अन्यायाच्या विरोधात बंड असो – आदर्श पत्रकाराच्या लेखणीतच समाजाची नवी दिशा लपलेली असते. समाजातील अन्याय, विषमता, आणि दुर्लक्षितांच्या वेदना – या सर्वांना आदर्श पत्रकार आपले शब्द देते. तो संवेदनशील असतो, परंतु भावनिक नव्हे. त्याच्या प्रत्येक ओळीमध्ये तथ्याची धार असते. तो केवळ 'ब्रेकिंग न्यूज'च्या मोहात न अडकता, समाजाच्या मुळाशी जाऊन प्रश्न विचारतो – का घडतेय हे? यामागचं सत्य काय? आदर्श पत्रकारितेचा महत्त्वाचा पैलू म्हणजे तथ्य पडताळणी (फॅक्ट-चेकिंग). अफवा आणि अर्धसत्याच्या जाळ्यात समाज अडकू नये, म्हणून पत्रकाराची भूमिका अत्यंत महत्त्वाची आहे. तो माहितीची खात्रीशीरता तपासतो, संदर्भ देतो आणि वाचकांना फसवणुकीपासून वाचवतो. या प्रक्रियेत त्याच्या प्रामाणिकपणाची खरी कसोटी लागते. मात्र, आदर्श पत्रकारिता ही केवळ सत्य सांगण्यातच मर्यादित राहत नाही. ती समाजाला नवे दृष्टिकोन देण्याचा प्रयत्न करते. जनतेच्या समस्या, त्यांच्या भावना आणि आकांक्षा – या सर्वांना आवाज देताना आदर्श पत्रकार लोकशाहीची मुळं घट्ट करतो. पत्रकार म्हणजे समाजाचा आवाज. तो गप्प राहिला, तर अन्यायाचा अंधार गडद होतो.

अर्थात, आदर्श पत्रकारालाही मर्यादा असतात – कधी राजकीय दबाव, कधी आर्थिक संकट, तर कधी वैयक्तिक सुरक्षेचा प्रश्न. तरीही तो न थकता, न घाबरता, न थांबता सत्याचा पाठलाग करतो. कारण त्याच्या नजरेत 'पत्रकार' ही केवळ नोकरी नाही, ती एक सामाजिक बांधिलकी आहे.

शेवटी, आदर्श पत्रकारितेचा गाभा म्हणजे समाजभान आणि विवेक. पत्रकाराची लेखणी ही तलवार असते – पण ती न्यायाच्या बाजूने चालविली पाहिजे. सत्याचा आवाज बुलंद करण्यासाठी, समाजाला सजग करण्यासाठी, आणि लोकशाहीला बळकटी देण्यासाठी आदर्श पत्रकारितेची गरज कालपरत्वे अधिकच वाढत आहे.

आजच्या झपाट्याने बदलणाऱ्या जगात, आपण सर्वांनी आदर्श पत्रकारितेला प्रोत्साहन द्यायला हवे – कारण केवळ तीच आपल्याला अंधारातून प्रकाशाकडे नेईल. आदर्श पत्रकार हा समाजाच्या आरशात सत्याचा शोध घेणारा दीपस्तंभ आहे – त्याला सलाम!

**आसाराम विरकर**
**उपसंपादक, दैनिक युवक आधार, मराठवाडा आवृत्ती**

# मोबाईलच्या दुकानाला आग

**दैनिक युवक आधार**
**पनवेल, दि.5 (वार्ताहर)** : पनवेल शहरातील लाईन आळी मधील एका बंद मोबाईल च्या दुकानाला आग लागली. पण पनवेल अग्निशमन दलाच्या विभागाच्या जवानांच्या प्रयत्नांमुळे मोठी हानी टळली असल्याची घटना घडली आहे.

शहरात लाईन आळी येथे गजबजलेल्या परिसरात टुडे मोबाईल हे दुकान आहे. या गाळ्याचे मूळ मालक उदय बने यांनी हे दुकान भाड्याने दिले आहे. या दुकानातून आज सायंकाळी सहाच्या सुमारास धूर येवू लागला.तो धूर आजूबाजूच्या दुकानात जावू लागला. त्यामुळे थोडी भिती पसरली. त्यावेळी आजूबाजूच्या नागरिकांनी पनवेल महानगरपालिकेच्या अग्निशमन दलास पाचारण केले. त्यांनी लागलीच घटनास्थळी धाव घेतली.आग लागलेले दुकान त्याचा मालक हा बाहेरगावी गेल्याने बंद होते. त्यामुळे दुकानाचे शटर तोडून ते उघडण्यात आले. हे शटर उघडताना धुराचा मोठा भडका बाहेर आला. दुकानात जास्त माल नसल्यामुळे वित्त हानी कमी झाली. पण वेळीच आग आटोक्यात आणली नसती तर मात्र मोठी हानी झाली असती. घटनास्थळी बघ्यांनी मोठ्या प्रमाणात गर्दी केल्याने थोडावेळ वाहतूक कोंडी झाली. ही आग आटोक्यात आणण्यासाठी पनवेल महानगरपालिकेचे अग्निशमन दलाचे शुभम राठोड, शिवा आडे, साजन म्हात्रे ( यंत्रचालक), मच्छिंद्र पोकळे (यंत्रचालक), राहुल सोनवळे (यंत्रचालक), सुदीप ठाकूर (फायरमन), निकितेश डुकरे (फायरमन), राहुल नागरे ( फायरमन), तेजश्री साळुंखे (फायरमन), सूरज मुळे (फायरमन) आदींनी प्रयत्न केले.




# सिल्लोड येथे महेश नवमीनिमित्त माहेश्वरी समाज बांधवांच्या वतीने रक्तदान शिबिर संपन्न

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**



**सिल्लोड** : - सिल्लोड येथे महेश नवमी निमित्त आयोजित रक्तदान शिबिराचे उद्घाटन माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्याहस्ते संपन्न झाले. शहरातील माहेश्वरी समाज बांधवांच्या वतीने या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले होते. शहरातील महेश स्तंभ जवळ हा उपक्रम राबविण्यात आला.

रक्तदान हे सर्वश्रेष्ठ दान असून महेश नवमीच्या निमित्ताने समाज बांधवांनी राबविलेल्या रक्तदान शिबिराचे माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर यांनी कौतुक केले. यावेळी अब्दुल समीर यांनी उपस्थितांशी संवाद साधत महेश नवमीच्या शुभेच्छा दिल्या. या शिबिरात जवळपास 52 जणांनी स्वयंस्फूर्तीने रक्तदान केले. शिवसेना शहर प्रमुख मनोज झंवर व त्यांच्या पत्नी माजी नगरसेविका सविता झंवर तसेच व्यापारी गोविंद लाठी व त्यांच्या पत्नी सारिका लाठी या दाम्पत्यांनी या रक्तदान शिबिरात रक्तदान केले. माजी नगराध्यक्ष अब्दुल समीर यांच्याहस्ते रक्तदान केलेल्या रक्तदात्यांना स्मृतिचिन्ह, प्रमाणपत्र देवून सन्मानित करण्यात आले. याप्रसंगी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक तथा माहेश्वरी समाज मंडळाचे अध्यक्ष रमेश लाठी , शिवसेना शहर प्रमुख मनोज झंवर, राधाकिसन मानधने, रणछोडदास होलानी, गोपाल सेट चांडक, शांतीलाल अग्रवाल, सत्यनारायण गट्टानी, बालुशेठ गट्टानी, दामोदर मालपाणी, गोविंद लाठी, सुभाष दरक, संजय झंवर, योगेश झंवर, शैलेश झंवर, कैलास होलानी, विनोद लद्दड ,सचिन लद्दड , सागर लद्दड, सुरेश तापडिया ,फहिम पठाण ,वैभव झंवर, रोहित चांडक ,अथर्व लद्दड आदींसह समाज बांधवांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

# सोनम केणी आत्महत्या प्रकरणी पेंधर ग्रामस्थांचा तळोजा पोलीस ठाण्यावर मोर्चा




दैनिक युवक आधार
नवीन पनवेल वार्ताहर
सोनम केणी आत्महत्या प्रकरणी पेंधर ग्रामस्थ आक्रमक झाले असून चार जून रोजी ग्रामस्थांनी तळोजा पोलीस ठाण्यावर मोर्चा काढला. एप्रिल महिन्यात पेठाली (माहेर-पेंधर) येथील सोनमने 4 वर्षीय मुलीची हत्या करून स्वतः आत्महत्या केली होती. त्यानंतर तळोजा पोलीस ठाण्यात हत्येचा गुन्हा दाखल करण्यात आला होता.

सासरच्या छळाला कंटाळून सोनमने चार वर्षीय मुलीची हत्या करत स्वतः आत्महत्या केली होती. त्यानंतर तळोजा पोलीसाकडून पती, सासू आणि चार ननंदे वरती गुन्हा दाखल करण्यात आला. या घटनेला महिना उलटूनही पोलिसांनी आरोपींना अटक केली नाही. महिनाभरापासून आरोपी फरार असल्याचा नातेवाईकांचा आरोप आहे. या आरोपींना तात्काळ अटक करण्याच्या मागणीसाठी आणि सोनमला न्याय मिळण्यासाठी हे आंदोलन केले.

# जुन्या सवंग गड्यासंगे साजरा केला स्नेहमेळावा

**दैनिक युवक आधार**
**बाळासाहेब रक्टाटे**
**( अंभोरा प्रतिनिधी )**



गृहपाठ केला नाही म्हणून शिक्षकांनी मारलेली छडी, शेवटच्या बेंचवर खोड्या करताना शिक्षकांनी फेकून मारलेला डस्टर, दररोज उशीरा येत असल्यामुळे दिलेली शिक्षा. अशा बऱ्याच जुन्या आठवणींना उजाळा देत जुन्या सवंगड्यांनी साजरा केला स्नेहमेळावा. नगर तालुक्यातील चिंचोडी पाटील येथील रयत शिक्षण संस्थेच्या न्यू इंग्लिश स्कूल मधील इयत्ता दहावीच्या 2008 साली शिक्षण घेणाऱ्या माजी विद्यार्थ्यांनी स्नेहमेळाव्याचे आयोजन केले होते. तब्बल सतरा वर्षांनी जुने मित्र शाळेत एकत्र जमा झाले. ज्या शिक्षकांनी आपल्याला घडविले अशा शिक्षकांना देखील या स्नेहमेळाव्यात निमंत्रीत केले होते. त्या शिक्षकांच्या उपस्थित एक तास वर्गात बसून, जुन्या आठवणीला उजाळा देत शिक्षकांनी या माजी विद्यार्थ्यांचा तास घेतला. 18 वर्षांनी एकत्र आल्यानंतर एकमेकांना ओळखणे अवघड झाले होते. व्हॅटसअॅपच्या माध्यमातून सर्व मित्रांना एकत्र आणत हा कार्यक्रम घेण्यात आला. शाळेच्या परिसरात एका रांगेत जोडीने हात धरुन सर्व शाळा पाहत भारत माता की जय, वंदे मातरम्च्या घोषणा दिल्या. प्रत्येकाने आपला परीचय देत शालेय जीवनात घडलेल्या जुन्या आठवणी सांगीतल्या. शिक्षकांनी कशा पध्दतीने शिक्षा दिल्या, कसे घडविले हे शिक्षकासमोर सांगीतले. या जुन्या आठवणीत शिक्षक, विद्यार्थी चांगलेच रमले होते. शिक्षकही प्रत्येक विद्यार्थी कसा खोडकर होता हे सांगत होते. प्रत्येक विद्यार्थी चांगल्या क्षेत्रात काम करत असल्याचे पाहून मुलांचे कौतुक केले. यापुढे वर्षातून एक दिवस एकत्र येण्याचे, अडचणीच्या काळात एकमेकांना मदत करण्याचे ठरले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी विशाल आगलावे,सुनिल कोकाटे, कुणाल छाजेड,युवराज हजारे, महेश खांदवे, अभिजीत माळशिकारे, पांडुरंग मोरे, अमित भद्रे, तसेच शुभांगी तरटे, शितल कोकाटे, रेखा कदम, उज्वला खडके, सुलोचना शेंदुरकर स्मिता खडके यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाचे अध्यक्ष विजय गायकवाड सर होते तर उपाध्यक्ष सोपान चोभे सर होते यावेळी शिक्षक शिंदे सी.डी , आबासाहेब कोकाटे, डि व्ही कोकाटे एच जी कोकाटे,गंगाधर देवकर,रमेश धस, टापरे सर ,घोडके सर ,अर्जुन धोत्रे, उंडे सर ,शिंदे ए एल,शेवाळे सर,जंगले सर,कटके सर मगर सर ,रमेश भांड ,जाधव मॅडम गायकवाड मॅडम , घोडके मावशी टेकाळे मामा उपस्थित होते.

# हरित कर्ज रोखे निधि उभारणारी पिंपरी - चिंचवड़ महानगर पालिका, महाराष्ट्र राज्यात अव्वल ठरली ,पहिली महानगर पालिका .

**दैनिक युवक आधार ,**
**शिवाजी वाघमारे**
**, चिखली, पिंपरी चिंचवड़, पुणे**



**पिंपरी:-** येथील पिंपरी चिंचवड महानगरपालिकाने हरित कर्ज रोखे (ग्रीन बॉंड) इश्यु करून २००/-कोटी रुपयांचा निधी यशस्वीरीत्या उभारला असून . अशी उल्लेखनीय कामगिरी करणारी संपूर्ण महाराष्ट्रात पहिली महानगर पालिका ठरली आहे . महापालिकेने हे रोखे बीएसईचया इलेक्ट्रॉनिक निवीदा प्रणालीवर खाजगी गुंतवणूकीच्या माध्यमातून इश्यु केले.या इश्युला गुंतवणूकदारांचा उत्स्फूर्तपणे प्रतिसाद मिळाला आहे गुंतवणूकदारांचा पिसीएमसीवर असलेला विश्वास अधोरेखित करत, इश्यु सुरू होताच केवळ एका मिनिटात १०० कोटी रुपयांचा मुळ भाग भरला गेला तर एकुण ५१३कोटी रुपयांच्या निवीदा प्राप्त झाल्या. म्हणजेच रोखे यांना ५.१३ पट अधिक मागणी मिळाली आहे . या हरित कर्ज रोखो इश्युला क्रिसील आणि केअर या मान्यताप्राप्त पतमानांकन संस्था कडुन एए+(AA+) दर्जा मिळाला आहे .ए के कॅपिटल सर्व्हिसेस लिमिटेड यांनी या इश्युसाठी व्यवहार सल्लागार आणि मर्चंट बॅंकर म्हणून काम पाहिले आहे . या हरित रोखे यांचा कालावधी पाच वर्षांचा आहे त्या साठी ७.८५ टक्के स्पर्धात्मक व्याजदर निश्चित करण्यात आला आहे.परतफेडीची हमी सुनिश्चित करण्यासाठी मालमत्ता करातून मिळणारे उत्पन्नाचे राष्ट्रीयकृत बँकेत एसक्रो खाते तयार करण्यात आले आहे .या यशस्वी इश्युमुळे पिसीएमसीला भारत सरकारकडून २० कोटी रुपयांचे प्रोत्साहनपर अनुदान मिळणार आहे . हरित कर्ज रोखे यातुन उभारण्यात आलेला निधी .हा निगडी प्राधिकरणातील हरित सेतू प्रकल्प आणि गवळी मठ ते इंद्रायणी नगर चौक दरम्यान चा टेल्को रस्ता विकास प्रकल्प या दोन महत्त्वाच्या पायाभूत प्रकल्पासाठी निधी वापरण्यात येणार आहे .हे दोन्ही प्रकल्प महापालिकेच्या शाश्वत व हवामानानुकुल शहरी विकासाचा अत्यंत महत्त्वाचा भाग आहे

# चिखलगाव येथे खेड तालुक्याचे माजी आमदार दिलीप अण्णा मोहिते पाटील यांच्या वाढदिवसाच्या निमित्ताने ,जनवराचें प्रशिक्षण व मोफत उपचार शिबर संपन्न झाले.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी:-डॉ देवेंद्र ओव्होळ**
**खेड पुणे**




**राजगुरूनगर:-** खेड तालुक्याचे माजी आमदार दिलीप अण्णा मोहिते पाटील यांच्या वाढदिवसाच्या हार्दिक शुभेच्छा पुणे जिल्हा दूध उत्पादक संघ व वाडा दूध केंद्रयांच्या संयुक्त यांच्या संयुक्त विद्यमाने चिखलगाव या ठिकाणी पशु वैद्यकीय मार्गदर्शन प्रशिक्षण व मोफत उपचार शिबिराचे आयोजन करण्यात आले होते सदरच्या शिबिरामध्ये जनावरांच्या आरोग्य संबंधी त्याचबरोबर दूध वाढ योग्य आहार व संगोपन याबाबत मार्गदर्शन करण्यात आले याप्रसंगी मार्गदर्शक म्हणून माननीय मनोहर पाटील नोवा फार्मा मॅनेजर यांनी दूध वाडी संबंध मध्ये योग्य ते मार्गदर्शन केले त्याचबरोबर पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाचे वैरण विकास अधिकारी सन्माननीय प्रशांत अहिरे साहेब यांनी पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाच्या वतीने दूध व्यवसायिक शेतकऱ्यांसाठी राबविल्या जाणाऱ्या अनेक योजनांची माहिती संबंधित शेतकरी बांधवांना त्या ठिकाणी दिली त्याचबरोबर आंबेगाव तालुक्यामध्ये पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाच्या माध्यमातून सेंद्रिय खताचा प्रकल्प उभारण्यात आलेला असून सेंद्रिय खताला चालना देण्यास संबंधित सन्माननीय पानसरे साहेब यांनी मार्गदर्शन केले त्या कार्यक्रमासाठी चिखलगाव आणि परिसरातील अनेक चेअरमन संचालक व दूध व्यवसायिक शेतकरी बंधू उपस्थित होते या शिबिराच्या आयोजनासाठी पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाचे विद्यमान संचालक अरुण शेठ चांभारे संचालिका लताताई गोपाळे कात्रज दूध उत्पादक संघाचे व्यवस्थापक उमेश कुंभार सोमनाथ गायकवाड सुभाष गोपाळे त्याचबरोबर विशेष करून ज्यांच्या निवेदनामध्ये हा कार्यक्रम पार पडला ते पुणे जिल्हा दूध उत्पादक संघाचे चेअरमन माननीय स्वप्निल भाऊ बाळासाहेब ढमढेरे यांनी कार्यक्रमाचे आयोजन केले होते या कार्यक्रमासाठी सामाजिक कार्यकर्ते डॉक्टर देवेंद्र ओव्हाळ डॉक्टर संतोष वीर साहेब डॉक्टर आडे साहेब सुभाष गोपाळे सोमनाथ गायकवाड श्री ज्ञानदेव गोपाळे चेअरमन बाळ श्रीराम गोपाळे सुरेश गोपाळे पाटील अनिल गोपाळे पाटील शंकर गोपाळे सचिन गोपाळे सचिन थोरात काळुराम भवार श्रीराम सुतार दगडोबा डावरे इत्यादी मान्यवरांनी हजेरी लावले त्याचबरोबर मोठ्या प्रमाणावर दूध व्यवसायिक व तरुण दूध व्यवसाय उपस्थित होते या कार्यक्रमाचे सूत्रसंचालन चिखलगाव चे माजी सरपंच श्री बाळासाहेब गोपाळे यांनी केले व आभार ज्ञानदेव गोपाळे यांनी मानले

**दैनिक युवक आधार** (RNI NO :- MAHMAR/2023/89514) **हे पत्रक मालक, प्रकाशक भारती संतोष आमले तसेच मुद्रक करणसिंग प्रल्हादसिंग सिरसवाल यांनी सिद्धि प्रिंटर्स, मंगल नगर मलकापूर पिन ४४३१०१ जि बुलढाणा येथे छापून दैनिक युवक आधार मुख्य कार्यालय २०३ इंद्रप्रस्थ रेसिडेन्सी ग्रामपंचायत जवळ मु पो आदई ता. पनवेल जि रायगड ४१०२०६ येथून प्रकाशित केले आहे. संपादक भारती संतोष आमले.**

daily YUVAK ADHAR (**RNI NO :- MAHMAR/2023/89514**) Printed by Karansingh Pralhadsingh Siraswal and published by Bharti Santosh Amle on behalf of Bharti Santosh Amle and printed at Siddhi Printers, MANGAL NAGAR MALKAPUR PIN 443101 DIST- BULDHANA. And Published at Head Office daily YUVAK ADHAR, INRAPRASTH SOCIETY, ? WING FLAT NO. 203-202 SERVE NO 28/1/ 3 PANVEL RAIGAD, ADAI PANVEL DIST-RAIGAD, Editor Bharti Santosh Amle

## कळंबोलीतील वसतीगृहासाठी मुलींनी अर्ज करण्याचे आवाहन

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**

सरकारच्या सामाजिक न्याय विभागांतर्गत कळंबोली, पनवेलमध्ये मागासवर्गीय मुलींचे शासकीय वसतिगृह कार्यरत आहे. या शासकीय वसतिगृहात २०२५-२६ या शैक्षणिक वर्षातकारिता मोफत प्रवेश देण्यात येणार असून इच्छुक विद्यार्थिनींनी अर्ज सादर करावेत, असे आवाहन गृहपाल उषा शशिकांत गुजेला यांनी केले आहे.

आठवी पासून गरीब, हुशार, होतकरु, मागासवर्गीय अनु.जाती, अनु, जमाती, विमुक्त जाती, भटक्या जमाती, इतर मागासवर्गीय, विशेष मागास प्रर्वग, आर्थिकदृष्टया मागाम, अनाथ व अपंग मुणवत्तेनुसार प्रवेश दिला जातो. संपर्क उषा गुजेला (८७६७३३९९७४) यांच्याशी कार्यालयीन वेळेत संपर्क साधावा .

## शिक्षक समृद्धी कार्यशाळेला प्रारंभ

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

न्या रानडे विद्या प्रसारक मंडळ संचलित
वैनतेय इंग्लिश मीडियम स्कूल मध्ये शिक्षक समृद्धी कार्यशाळेला प्रारंभ झाला २ जून पासून सुरुवात झाली असून १६ जून पर्यंत ही कार्यशाळा संपन्न होणार आहे. निफाड राष्ट्रीय शैक्षणिक धोरण 2020 च्या (एन इ पी) मार्गदर्शक तत्त्वानुसार
नाशिक येथील अलखीद्र अकादमीच्या नाजनीम सय्यद यांच्या मार्गदर्शनाखाली दररोज 3 तास उपस्थित शिक्षकांना मार्गदर्शन करण्यात येणार आहे यामध्ये स्पोकन इंग्लिश, रायटिंग स्किल ,व्यक्तिमत्व विकास व इतर घटकांवर मार्गदर्शन करण्यात येणार आहे या कार्यशाळेचे उदघाटन न्या रानडे विद्या प्रसारक मंडळ संस्थेचे कार्यकारी विश्वस्त वि .दा .व्यवहारे , संस्थेचे सचिव रतन पाटील वडघुले, संस्थेचे विश्वस्त दिलीप वाघवकर, मधुकर राऊत ,प्राचार्य पल्लवी सानप आदी मान्यवर उपस्थित होते



## राळेगाव शहराच्या इतिहासात प्रथमच महिला ठाणेदार रुजू

### शितल मालते यांनी पदभार स्वीकारला

**दैनिक युवक आधार**
**यवतमाळ जिल्हा प्रतिनिधी**
**:-जितेंद्र खोडे**



**राळेगावः**- पोलीस स्टेशनमध्ये इतिहास घडवत महिला पोलीस निरीक्षक शितल मालते यांनी ठाणेदार म्हणून नुकताच पदभार स्वीकारला आहे. त्या राळेगाव शहराच्या पोलीस दलातील पहिल्या महिला पोलीस अधिकारी ठरल्या असून, या आधी राळेगावमध्ये केवळ पुरुष पोलीस अधिकारीच नियुक्त होत होते.
शितल मालते या २००९ बॅचच्या अनुभवी पोलीस अधिकारी आहेत. त्यांनी आपले पोलीस प्रशिक्षण मुंबई येथे पूर्ण केले असून, त्याआधी त्या यवतमाळ येथे प्रभावीपणे सेवा बजावत होत्या. त्यांची कार्यशैली काटेकोर, शिस्तप्रिय आणि जनतेशी सुसंवाद राखणारी असल्याचे सहकाऱ्यांकडून सांगण्यात येते.
राळेगावसारख्या ग्रामीण भागात महिला पोलीस अधिकारी ठाणेदार पदावर रुजू होणे ही सामाजिक दृष्टिकोनातून सकारात्मक पावले मानली जात असून, महिला सक्षमीकरणासाठी प्रेरणादायी ठरणारी घटना ठरली आहे. नागरिकांतून स्वागताचे सूर उमटत आहेत व महिलांमध्येही सुरक्षिततेचा विश्वास अधिक दृढ झाल्याचे चित्र दिसून येत आहे.

## तुकाराम चोरगे माजी सरपंच यांची लक्ष्मी भाग्यश्री चोरगे यांनी जपली परंपरा...

### जणू आज ही जातेवरची कसरत...

**दैनिक युवक आधार**
**उल्हासनगर/रशीद शेख**



आजीबाई वयाच्या 80 वर्षात आजुन पण जातेवर तुरीची डाळ बनवतात ते आपल्याला दिसतं आहे जात्यावरची डाळं म्हणजे चवीदार असते असे आजीबाई आम्हाला सांगता रानातल्या भाज्या शवली तेलपट कंटुली लोद अश्या भाज्यांचे नावांची ओळख करून आम्हाला दिली त्या भाज्या खाल्याने आरोग्याला चांगले असते त्यांना त्या भाज्या फक्त पावसाळ्यामध्ये मिळतातं खायला त्या फक्त वर्षाला मिळतातं बाकी दिवस मिळतं नाही सर्वात जास्त आपल्या शरीराला शेवलीचा रस्सा फारच चांगला एक वाटी प्या मगं बघा आपल्याला कसे वाटते म्हणून आम्ही आजही 80 वर्षात कामं करतोय आणि तुम्ही तर रोज मटण मछी खातात तरीहि तुम्ही बीमार पडतात

# पनवेल येथील पर्यावरण आणि ऐतिहासिक वारसा..

**दैनिक युवक आधार**
**पनवेल प्रतिनिधी**

आज दिनांक ५ जून २०२५
जागतिक पर्यावरण दिनानिमित्त
पनवेल मधील एतिहासिक स्थळांना भेट देण्यात आली

वडाळे तलाव,बल्लालेश्वर मंदिर, बापट वाडा, राईस मिल ,कापड बाजार,मिरची गली. इस्त्रायल तलाव अशा विविध एतिहासिक ठिकाणांना भेट देण्यातआली. यावेळी महान शहर मावळता वारसा या पुस्तकाच्या लेखिका प्रा. स्मिता दळवी यांनी उपस्थितना एतिहासिक ठिकाणांना बद्दल माहिती दिली. पनवेल हे जसे तलावांचे शहर आहे तसेच मंदिरांचे आणि दर्गा मशिदीचेही शहर आहे. पनवेलमध्ये सहा तलाव आहेत. सर्वात मोठा असलेल्या वडाळे तलावाच्या काठी बल्लाळेश्वर आणि रामेश्वर मंदिर आहे. शहराच्या मध्यभागी असलेल्या कृष्णाळे तलावाकाठी कृष्णेश्वराचं मंदिर आहे. देवाळे तलावासमोर करमअली शाह दर्गा आहे. लेंडाळे तलावाला लागून जुम्मा मशीद आहे. विश्राळे तलावाला स्थानिक लोक जवळच्या बेने इस्त्रायली समाजाच्या कब्रस्तानामुळे आणि प्रार्थना स्थळामुळे इसराइल तलाव असे म्हणतात. प्रत्येक




तलावाचा इतिहास भूगोल वेगवेगळा आहे. १७३९ मध्ये वसईच्या यशस्वी लढाईनंतर परतताना चिमाजी आप्पांच्या मराठा सैन्याकडून बापटांनी वडाळे तलाव खोदून घेतला अशी माहिती मिळते. या वडाळे तलावाचे पनवेल महानगरपालिकेने चांगले सुशोभीकरण केले आहे. इतरही तलावांचे जाणीवपूर्वक जतन केले तर शहराची ही फुफूसं पनवेलचे पर्यावरणीय आरोग्य अबाधित राखतील. हिंदू मुस्लिम ऐक्याची इथली गंगा जमनी तहजीबची एक कथा सांगितली जाते. देवाळे तलावाच्या काठी असणाऱ्या सुफी संत ख्वाजा करमअली शाह यांच्या दर्ग्यावर वार्षिक उरुसाच्या प्रसंगी पहिली चादर चढवण्याचा मान परंपरेनुसार पेशव्यांचे सरदार बाळाजीपंत बापट यांच्या कुटुंबासाठी राखून ठेवला जातो.. मनातलं मळभ दूर करणारा आजच्या भटकंतीतला हा क्षण आहे. जगद्गुरु संत तुकाराम देहूहून पनवेल येथील बाजारात मिरच्या विकण्यासाठी आले होते. कृष्णाळे तलावाकाठी त्यांचे सुंदर मंदिर पहावयास मिळाले. स्वातंत्र्यपूर्व काळापासून येथे जवळपास ३० राईस मिल होत्या. युसुफ मिया मिल यांची चालू अवस्थेतील राईस मिल पाहिली. त्यांच्या वंशज्यांशी बोलणं झाले. १८७२ साली पुराणिक बंधूंनी धूतपापेश्वर कारखाना स्थापन केला. लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, सुभाषचंद्र बोस अशा महान विभूतींनी या ठिकाणी आयुर्वेदिक औषधोपचार घेतलेले आहेत.. बंदर ते विमानतळ असा पनवेलचा विस्मयकारी प्रवास चालू आहे. आता बंदर अस्तित्वात नाही. कोळीवाड्यात त्या बाजूला गेलो असता काही मुलनिवासी कोळी बांधव भेटले. २६ जुलै २००५ च्या पुरात स्वतःला झोकून देऊन जीवाची बाजी लावून श्री कमळाकर पांडुरंग कोळी या बांधवाने तब्बल ३८ जणांचे प्राण वाचवले होते.. भारतमातेच्या या शूर वीराला मनोमन सलाम केला.. राष्ट्र सेवा दल, मिशन माणुसकी, संविधान प्रचारक, योग ग्रुप असे अनेक मान्यवर पनवेलकर या आजच्या पर्यावरण संवर्धनाच्या निमित्ताने काढलेल्या फेरीला आवर्जून उपस्थित होते. पनवेल मधील तलावाच्या जवळ असलेल्या मशिदी आणि मंदिर म्हणजे गंगा जमुना तहजीब चे दर्शन होते. हिंदू आणि मुस्लिम घटकांच्या मिश्रणाने वैशिष्ट्यीकृत संस्कृतीचा संदर्भ पनवेल मधल्या एतिहासिक ठिकाणात दिसून येते . पनवेल मध्ये झपाट्याने होणाऱ्या विकास कामामुळे पर्यावरण आणि एतिहासिक वस्तूंचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे असे दिसून येते राष्ट्र सेवा दलाच्या ग्रीन नेटवर्क (नवी मुंबई विभागाच्या वतीने PANVEL HERITAGE WALK आयोजन करण्यात आले होते. यापुढे ही राष्ट्र सेवा दलच्यावतीने पर्यावरण संवर्धनाचे विविध उपक्रम राबविले जातील अशी माहती प्रवीण जठार यांनी दिली. विनीत बालकुंद्री,मारुती शेरकर, चित्रकार उत्तम घोष संविधान प्रसारक धनश्री आणि प्रवीण जठार यांनी या कार्यकमच्या आयोजनात महत्त्वाची भूमिका बजावली
राष्ट्र सेवा दल (नवी मुंबई विभाग )
9867708408
9833775814

## ओव्हरलोड वाहतूक श्रीवर्धन / म्हसळा तालुक्यातील नागरिकांसाठी डोकेदुखी ! संबंधित शासकीय यंत्रणांनी घेतले झोपेचे सोंग !

**दैनिक युवक आधार**
**परशुराम पायकोळी**
**(दिघी) वार्ताहर**

सविस्तर वृत्त असे की, दिघी पोर्ट / अदानी पोर्ट मुळे चर्चेत आलेल्या श्रीवर्धन तालुक्यात ओव्हरलोड वाहतूक सर्व सामान्य नागरिकांसाठी डोकेदुखी ठरत असून श्रीवर्धन तालुक्यातील नागरिक संबंधित शासकीय यंत्रणांकडे लेखी तक्रार दाखल करून वेळोवळी पाठपूरावा करूनही ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्यांवर संबंधित प्रशासन कारवाई करण्यात चालढकल करून अप्रत्यक्षरीत्या सर्वसामान्य नागरिकांच्या जिवाशी खेळत आहे. सर्व सामान्य नागरिकांवर कायदेशिर कारवाई करण्यात कार्यतत्पर असणाऱ्या संबंधित शासकीय यंत्रणा मात्र ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्यांवर कारवाई का करत नाही असा गहन प्रश्न नागरिकांकडून उपस्थित केला जात आहे. ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्या वाहनांचे ओव्हरलोड वाहतूक करतानाची छायाचित्रे / छायाचित्रणे वेगवेगळया वृत्तपत्रांमध्ये / वृत्तवाहिन्यांवर वेळोवळी प्रसिद्ध करूनही संबंधित शासकीय यंत्रणा मात्र झोपेचे सोंग घेऊन आहेत. मागील काही वर्षांपासून श्रीवर्धन / म्हसळा तालुक्यात असे अनेक अपघात घडले आहेत असेच अपघात दिनांक :- ०२ जून २०२५ रोजी रात्री ०१:०० वाजताच्या सुमारास गडबवाडी माईनिंग साईटवरून बॉक्साईट वाहतूक करणाऱ्या दोन डंपरचा अपघात घडल्याची घटना घडली. यापैकी एक डंपर कोलमांडले हद्दीत रस्त्याबाहेर गेला तर दुसरा डंपरचा निगडी परिसरात रस्त्याबाहेर दहा फूट खोल पलटी होऊन



अपघात घडला. अपघात झालेल्या वाहनाचा वाहन चालक नशेत असल्याची शक्यता वर्तवली जात आहे. अपघाताने नागरिक भयभीत झाले असून जीवघेणा अपघात घडण्याची शक्यता नाकारता येत नाही याची दखल घेत डंपर वाहतूक बंद करावी तसेच योग्य त्या उपाययोजना संबंधित शासकीय यंत्रणांकडून करण्यात याव्यात अशी मागणी होत आहे. यावर्षी मे महिन्यातच अवकाळी पावसाळा सूरू झाला असून पावासाने ठिकठिकाणी रस्ते साईड खचू लागले असताना धारवली, गडबवाडी माईनींग साईटवर अंदाजे तीस डंपर दिवस रात्री चालू आहेत. या पैकी काही वाहनचालक मोठ्याप्रमाणात मद्य नशेत असतात असे अनेकवेळा नागरिकांच्या निर्दशनासही आले आहे. या दोन्ही अपघातात वाहन चालकांचा नियंत्रण सुटल्याने डंपर रस्त्याबाहेर जाऊन अपघात घडला आहे. सुदैवाने वाहनचालकाला दुखापत झाली नसून वाहनचालक घटनास्थळी डंपर सोडून फरार झाल्याचे समजले. सकाळी ०९:०० ते दुपारी ०२:०० या वेळेत दोन क्रेनमशीन व एक जेसीबी च्या सहाय्याने डंपर बाहेर काढण्यात यश आले. यावेळी दोन्ही दिशेला जाणाऱ्या नागरिकांना मात्र नाहक त्रास सहन करावा लागला. पाऊस सुरू झाला असून देखील गडबवाडी व धारवली माईनीग ट्रान्सपोर्ट चालवणाऱ्यांकडून डंपर चालकांना जबरदस्ती बॉक्साईट वाहतूक करण्यात येत असल्याची चर्चा होत आहेत. दहा चाकी ओअरलोड वाहतुकीमुळे गडबवाडी, कोलमांडले ते निगडी रस्त्यावर मोठे मोठे खड्डे झाले आहेत. अपघातात जीवित हानी झाली नाही घटनास्थळी रस्त्याची दैनिय अवस्था झाली आहे याची ट्रान्सपोर्ट धारकांनी दखल घेऊन लवकारात लवकर रस्ता दुरुस्ती करावी अशी नागरिकांची मागणी आहे. संबंधित शासकीय यंत्रणांकडून ओव्हरलोड वाहतूक करणाऱ्यांवर योग्य ती कायदेशिर कारवाई करण्यासह वाहनाचा वाहतूक परवाना , किती वजन वाहतूक करण्याची परवानगी आहे, पीयुसी, विमा वैधता, वाहनचालकांचे परवाना वैधता तसेच वाहतूक सुरू असताना वाहनचालक मद्य पिऊन दारूच्या नशेत वाहतूक तर करत नाही याची वेळोवळी तपासणी करून योग्य त्या उपाययोजना करून सर्वसामान्य नागरिकांना दिलासा द्यावा अशी मागणी श्रीवर्धन तालुक्यातील नागरिक करत आहेत.

## द्राक्ष बागाईतदार संघाचे वतीने कोकणगाव येथे विशेष चर्चासत्र

**दैनिक युवक आधार**
**निफाड । प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**

महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाचे वतीने शुक्रवार आज दि. ६ रोजी दु १२ वा कोकणगांव येथील भास्कर गार्डन मंगल कार्यालयात द्राक्षबागेच्या सद्यस्थितीत निर्माण झालेल्या विविध समस्यांवर विशेष चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले आहे अशी माहिती द्राक्ष बागाईतदार संघाचे विभागीय अध्यक्ष बाळासाहेब गडाख,मानद सचिव बबनराव भालेराव यांनी दिली आहे महाराष्ट्र राज्य द्राक्ष बागाईतदार संघाचे अध्यक्ष कैलासराव भोसले यांचे हस्ते या विशेष चर्चासत्राचे उदघाटन केले जाणार आहे मे २०२५ पासून सलग २५ दिवस नाशिक जिल्ह्यात सर्वत्र जोरदार विक्रमी पाऊस झाला.असा प्रसंग द्राक्ष बागाईतदार शेतकर्यांनी यापुर्वी कधीही अनुभवला नाही. त्यामुळे द्राक्षबागेमध्ये काडी व्यवस्थापन व घड निर्मितीसाठी मोठ्या अडचणींशी तोंड द्यावे लागत आहे या शिवाय करपा व इतर रोगांचा प्रादुर्भाव वाढला आहे द्राक्षबागेतील मातीचे आरोग्य, खते व पाणी या संदर्भात निर्माण झालेल्या नैसर्गिक आपत्तीमुळे उद्भवलेल्या अडचणींवर उपाययोजना करणेसाठी चर्चासत्र आयोजित केले आहे द्राक्षबागेत ढगाळ व पावसाळी वातावरणात काडी व्यवस्थापन व घड निर्मितीसाठी संजीवकांचा वापर या विषयावर एन आर सि पुणेचे शास्त्रज्ञ डॉ. आर. जी. सोमकुंवर द्राक्षबागेतील मातीचे आरोग्य, खते व पाणी व्यवस्थापन या विषयावर डॉ.ए.के. उपाध्याय जिवाणूजन्य व बुरशीजन्य करपा, डाउनी व इतर रोग व्यवस्थापन या विषयावर डॉ.सुजॉय सहा यांचे मार्गदर्शन होणार आहे चर्चासत्रासाठी कोणतेही प्रवेश शुल्क नाही तरी द्राक्ष बागाईतदारांनी उपस्थित राहुन चर्चासत्राचा लाभ घ्यावा असे अवाहन नाशिक विभागीय अध्यक्ष बाळासाहेब गडाख,मानद सचिव बबनराव भालेराव तसेच संचालक मंडळाने केले आहे.

# दुचाकी स्वारास अडवून एकास जिवे मारून आणि एकास जिवे मारण्याची धमकी देणाऱ्या आरोपीच्या गुन्ह्यात वाढ करण्यात आली.

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधीःसंतोष लांडे**
**पुणे कात्रज**

कात्रज :दिनांक ०५/०४/२०२५ रोजी रात्रौ १०/३० वा. चे सुमारास फिर्यादी व त्यांचा मित्र असे दुचाकीवरून राहत्या घरातून कात्रजकडे जात असताना जुन्या भांडणाच्या कारणावरून टोळी प्रमुख आकाश भरत थोरात, वय ३२ वर्षे, रा रुम नं २, परदेशी विल्डींग जवळ, साच्याईमाता मंदिराच्या मागे, अटल चाळ नं ४. आंबेगाव खु॥ पुणे, २) टोळी सदस्य अजित अंकुश धनावडे वय २४ वर्षे (पाहिजे आरोपी), ३) टोळी सदस्य आदित्य जालिंदर शिंदे, वय १८ वर्षे, ४) टोळी सदस्य रोहीत बाळासाहेब कचरे वय २१ वर्षे ५) टोळी सदस्य विशाल उर्फ मोळ्या दिपक गणेचारी वय २१ वर्षे, यांच्या सांगण्या वरून एकुण सहा विधीसंघर्षीत बालकांनी फिर्यादींच्या दुचाकीस गाड्या आडव्या मारून "तुम्हाला लय मस्ती आली का, तुमचे मित्र आदित्य काकडे व साहिल काकडे यांनी आमचा मित्र आदित्य शिदे यास मारहाण केली आहे तुम्हाला आमच्या




भाईंनी बघून घ्यायला सांगीतले आहे. तुम्हाला आता जिवंत सोडत नसतो." असे बोलून फिर्यादी व त्यांचा मित्र यांस जिवे मारण्याच्या उद्देशाने त्यांच्यवर धारदार हत्याराने वार करून गंभिर जखमी केल्याने आंबेगाव पोलीस ठाण्यात खालील प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला रजि. नं. ५३/२०२५ भारतीय न्याय संहिता कलम १०९,१२६ (२), ३५२.३ (५), कि. लॉ. अं. ॲ. कलम ७ प्रमाणे गुन्हा सदर घटनेत फिर्यादी यांचा मित्र उपचारादरम्यान मयत झाल्याने भारतीय न्याय संहिता क. १०३ प्रमाणे कलमवाढ केलेली आहे. नमुद आकाश थोरात टोळीतील टोळी प्रमुख व टोळी सदस्य यांच्या वर संयुक्त व वैयक्तीकपणे सन २०१५ पासून एकुण १० गंभिर स्वरुपाचे गुन्हे दाखल आहेत. सदर गुन्हे त्यांनी त्यांच्या टोळीची दहशत निर्माण करून त्यापासून आर्थिक फायदा मिळवीण्यासाठी केलेले आहेत. टोळी प्रमुख आकाश भरत थोरात याने त्याच्या टोळीचे वर्चस्व प्रस्थापित करण्यासाठी प्रत्येक वेळी वेगवेगळ्या गुन्हेगार साथीदारांचा वापर केलेला आहे. टोळी प्रमुख व टोळी सदस्य यांच्या वर प्रत्येक वेळी प्रतिबंधक कारावाई करून देखील त्यांच्या बेकायदेशीर कारवाया वाढत चाललेल्या असल्याने त्यांचेवर ठोस व कडक कारवाई करणे आवश्यक होते. यातील आरोपी यांनी संघटितपणे दहशतीच्या मार्गाने स्वतःचे व टोळीचे वर्चस्व निर्माण करण्याच्या हेतुने व आर्थिक फायदयासाठी सदरचा गुन्हा केल्याचे दिसुन आलेने तसेच त्यांच्या वर्तनात सुधारणा होत नसल्याने प्रस्तुत गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन. १९९९ चे कलम ३ (१) (II). ३(२), ३(४) प्रमाणे चा अंतर्भाव करणेकामी आंबेगाव पोलीस स्टेशनचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक श्री शरद झिने यांनी मा.पो. उप-आयुक्त परि-२, पुणे शहर, श्रीमती स्मार्तना पाटील यांचे मार्फतीने मा. अपर पोलीस आयुक्त पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर, श्री. राजेश बनसोडे यांना सादर केलेला होता. सदर प्रकरणाची छाननी करुन आंबेगाव पोलीस ठाणेस गुन्हा रजि. क्र. ५३/२०२५ भारतीय न्याय संहिता क. १०३,१०९,१२६ (२), ३५२, ३(५) आर्म ॲक्ट कलम ४(२५), सह क्रि. लॉ. अं. ॲ. क ७ प्रमाणे दाखल गुन्हयास महाराष्ट्र संघटित गुन्हेगारी नियंत्रण अधिनियम सन. १९९९ चे कलम ३(१) (II) ३(२), ३(४) प्रमाणेचा अंर्तभाव करण्याची मा. अपर पोलीस आयुक्त पश्चिग प्रादेशिक विभाग, पुणे शहर श्री राजेश बनसोडे यांनी दि.०३/०६/२०२५ रोजी मान्यता दिलेली आहे. सदरची उल्लेखनिय कामगीरी मा.श्री. अमितेश कुमार, पोलीस आयुक्त पुणे शहर, मा. रंजनकुमार शर्मा, पोलीस सह आयुक्त, पुणे शहर मा. श्री. राजेश बनसोडे, अपर पोलीस आयुक्त, पश्चिम प्रादेशिक विभाग, पुणे शहर, मा. श्रीमती स्मार्तना पाटील, पोलीस उप आयुक्त परि-२, पुणे शहर, मा. अतुल नवगिरे, सहा. पोलीस आयुक्त लष्कर विभाग तथा अतिरिक्त कार्यभार स्वागेट विभाग, पुणे शहर गा. राहुल आवारे सहा. पोलीस आयुक्त, स्वारगेट विभाग, पुणे शहर, यांचे मार्गदर्शनाखाली श्री. शरद झिने वरिष्ठ पोलीस निरीक्षक, आंबेगाव पोलीस स्टेशन, श्री गजानन चोरगुले पोलीस निरीक्षक (गुन्हे), श्री. भोजलिंग दोडमिरो, सहा. पोलीस निरीक्षक, श्री युवराज शिंदे पोलीस उप निरीक्षक व स.पो. फौजदार चंद्रकांत माने, पो. हया. ७४२१ ढमढेरे, पो शि. ८१३८ अजय सावंत, पो. शि. आबासो खाडे यांनी केली आहे.

# समता फाउंडेशनच्या सहभागाने जलतारा उपक्रम मध्ये रिसोड तालुक्याची नेत्रदीपक कामगिरी

**दैनिक युवक आधार**
**रिसोड : तालुका प्रतिनिधी.**
**रणजीत सिंह ठाकुर**

माननीय जिल्हाधिकारी वाशिम यांचा जलसंधारणाचा महत्वकांशी उपक्रम जलतारा मध्ये समता फाउंडेशनच्या सक्रिय सहभागाने वाशिम जिल्ह्यात रिसोड तालुका तिसऱ्या क्रमांकावर आहे. शेती पाणीदार करण्यासाठी पाण्याची उपलब्धता करणे अत्यावश्यक आहे. शेती समृध्द करूनच आपल्या जिल्ह्याचा विकास होवू शकतो, त्यासाठी प्रत्येक शेतकर्‍यांनी जलतारा प्रकल्प योजना १ मार्च पासून शेतात राबविविण्यास सुरूवात केली. जिल्हाधिकारी यांनी जलतारा योजनेच्या यशस्वीतेसाठी जिल्ह्यातील सेवाभावी संस्थांना सहभागी होण्याचे आवाहन केले होते त्याला सकारात्मक प्रतिसाद देत समता फाउंडेशन ने रिसोड तालुक्यातील काही गावांमध्ये




शेतकऱ्यांना मोफत जलतारा प्रकल्पातील गड्डे खोदून देण्याची जबाबदारी घेतली. ३० मे पर्यंत चाललेल्या जलतारा अभियानामध्ये रिसोड तालुक्यात एकूण ६५६३ जलतारा गड्डे खोदण्यात आले या मध्ये २८०४ जलतारा गड्डे एकट्या समता फाउंडेशन ने शेतकऱ्यांना मोफत खोदून दिले व या महत्वकांक्षी उपक्रमामध्ये आपला सिंहाचा वाटा उचललेला. समता फाउंडेशनच्या या उपक्रमातील सहभागामुळे रिसोड तालुका हा जिल्ह्यामध्ये तिसऱ्या क्रमांकावर राहिला. रिसोडच्या तहसीलदार प्रतीक्षा तेजनकर व त्यांच्या संपूर्ण टीमच्या मार्गदर्शनाखाली जलतारा उपक्रमांतर्गत समता फाउंडेशनणे तालुक्यातील मांडवा ११०, घोटा ५१०, कुऱ्हा २०, भर जहागीर १४९, रिसोड ६, मोठेगाव २९, कंकरवाडी ३९५, वाकद १९४,मोप २३, वाघी ८९५, गोहगाव हाडे ७५, गुण सर १८२, गोभणी १४१, महागाव २९, निजामपूर ४६ खेड्यांमध्ये जलतारा उपक्रमांतर्गत गड्डे खोदले.

समता फाउंडेशन मागील सात वर्षापासून रिसोड तालुक्यांमध्ये जलसंधारणाची कामे करीत असून शिरपूर ( धुळे ) पॅटर्न अंतर्गत ४. ७७ की मी शेतातील नाल्याचे खोलीकरण व रुंदीकरण करून त्यावर बांध बांधले. २०१८ ते २०२४ मध्ये रिसोड येथील श्री पिंगलाक्षी देवी तलावातील १८५८६ ट्रिप गाळ काढून गरजू शेतकऱ्यांना मोफत देण्यात आला. मागील वर्षी सोमठाणा व आडोळ प्रकल्पातील गाळ सुद्धा समता फाउंडेशन ने मोफतरित्या काढला. रिसोड तालुक्यामध्ये समता फाउंडेशन ची स्वतःची नर्सरी असून २०१८ ते २०२५ मध्ये ४,४८,७९४ शेतकऱ्यांना बांधावर लावण्यासाठी झाडांचे वाटप करण्यात आले तसेच रिसोड शहरामध्ये २०१८ ते २०२५ मध्ये १८,०५० झाडे लावण्यात आली व त्याचे नियमित संगोपन करण्यात आले त्यापैकी १३५०० झाडे आजही जिवंत आहेत. रिसोड प्रमाणेच पालघर व भुसावळ जिल्ह्यामध्ये सुद्धा समता फौंडेशनच्या नर्सरी आहेत.

२०१८ पासून समता फाउंडेशन करीत असलेल्या जनसंधारणाच्या कामामुळे तालुक्यातील हजारो शेतकऱ्यांच्या उत्पन्नात व जीवनमानात फरक पडला आहे. जलसंधारणा व्यतिरिक्त समता फाउंडेशन आरोग्य, शिक्षण, रोजगार क्षेत्रात अग्रेसर आहे. कोविड काळात रिसोड तालुक्यातील नागरिकांना मोफत पहिला दुसरा व बूस्टर डोस देऊन रिसोड नागरिकांसाठी संकटमोचक म्हणून समोर आलेत. समता फाउंडेशनचे अध्यक्ष श्री पुरुषोत्तम अग्रवाल हे मूळचे रिसोडच्या रहिवाशी असून आपल्या मातृभूमीचे ऋण म्हणून ते रिसोड कडे अधिक लक्ष देतात.

## वैनगंगा नळगंगा नदीजोड योजनेअंतर्गत वाशिम जिल्ह्याच्या रिसोड तालुक्यातील पैनगंगा नदीवरील प्रस्तावित को,पो, बंधाऱ्याचे बॅरेज मध्ये.रूपांतर. करा.

**दैनिक युवक आधार**
**तालुका प्रतिनिधी रिसोड .**

लखनसिंह ठाकुर यांनी* *मुख्यमंत्र्याकडे पत्राद्वारे केली मागणी *महाराष्ट्र राज्याचे सिंचन विकास पुरुष तथा कर्तव्यदक्ष मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस साहेब यांच्याकडे भाजपाचे लखनसिंह ठाकुर यांनी वाशिम जिल्ह्यातील रिसोड तालुका हा सिंचनाच्या बाबतीत अत्यंत मागासलेला भाग आहे सिंचन विकासाच्या दृष्टीने कोल्हापुरी बंधाऱ्याचे बॅरेज मध्ये रूपांतर केल्याशिवाय पर्याय उपलब्ध होणार नाही वाशिम जिल्ह्यातील पैनगंगा नदीवरील बाळखेड ,धोडप ,भापूर मसला पेन आसेगाव या पाच को,पो, बंधाऱ्याचे बॅरेज मध्ये रूपांतर करण्याची मागणी मागील अनेक वर्षापासून सर्वच लोकप्रतिनिधी शेतकरी व



जिल्ह्यातील भाजप पदाधिकाऱ्यांची आहे तात्कालीन मुख्यमंत्री देवेंद्र फडणीस साहेब मुख्यमंत्री असताना तसेच जलसंपदा मंत्री गिरीश महाजन साहेब असताना अनेक वेळेस या ५ हि बॅरेजला मंजुरी मिळण्यात यावी याकरिता मंत्रालयीन दालना मध्ये बैठकी सुद्धा पार पडल्या या सर्व कोल्हापुरी बंधाऱ्याचे रूपांतर मॅरेजेस मध्ये व्हावा हा पाठपुरावा मी अनेक वर्षापासून करीत आलेला आहो परंतु या प्रकल्प करिता पाणी उपलब्धता प्रमाणपत्र नाशिक जलविज्ञान केंद्राकडून न भेटल्यामुळे प्रकल्पाचे प्राथमिक सर्वेक्षण अहवाल तयार असून सुद्धा सदर प्रकल्प अनेक वर्षापासून रखडलेले आहे तथापि आपल्या पैनगंगा नळगंगा नदीजोड या महत्त्वकांक्षी योजनेमध्ये टप्पा क्रमांक ४ नळगंगा धरण ते पैनगंगा व वाशिम जिल्ह्यातील तुटीचे क्षेत्र याचा समावेश आहे तरी या महत्त्वकांक्षी योजनेअंतर्गत रिसोड तालुक्यातील पैनगंगा नदीवरील वालखेड ,धोडप ,भापूर ,मसला पेन व आसेगाव या पाच को पो बंधाऱ्याचे बॅरेज मध्ये रूपांतर करण्याचा समावेश करण्यात यावा सदरच्या कामाचे सर्वेक्षण करणेबाबत आपल्या स्तरावरून निर्देशित करण्यात यावे ही विनंती अशा आशयाचे पत्र भाजपा उत्तर भारतीय महाराष्ट्र प्रदेशाचे सचिव लखनसिंह ठाकुर यांनी एका पत्राद्वारे केले *वैनगंगा नळगंगा नदी जोड योजनेअंतर्गत सदर प्रकल्प समाविष्ट केल्यास उपरोक्त बालखेड धोडप,गोहोगाव , सरपखेडा एकलासपूर मसला पेन महागाव वाडी वाकद एकलासपूर या गावातील शेतकऱ्यांना सिंचनाचा लाभ क्षेत्राच्या दृष्टीने विशेष लाभ घेता येणार आहे असे त्यांनी सांगितले*

# पनवेल प्रेस क्लब च्या वतीने अरविंद म्हात्रे यांना पर्यावरण योद्धा पुरस्काराने सन्मानित




पनवेल , ता ५ ( प्रतिनिधी ) आपले कार्यच आपली ओळख निर्माण करीत असते आणि आपल्या सामाजिक कार्याच्या हेतूची शुद्धताच आपल्याला पुरस्कारापर्यंत पोहोचवते असे प्रतिपादन देविदास गायकवाड यांनी बोलताना केले. ५ जून या जागतिक पर्यावरण दिनाचे औचित्य साधून नावडे येथे कासाडी नदीच्या संवर्धनासाठी यशस्वीपणे न्यायालयीन लढाई लढणाऱ्या अरविंद म्हात्रे यांचा पनवेल प्रेस क्लबच्या माध्यमातून नागरी सत्कार करून त्यांना संस्थेच्या वतीने पर्यावरणवादी योद्धा पुरस्कार देऊन सन्मानित करण्यात आले त्यावेळी ते बोलत होते. ते पुढे म्हणाले कि, शुद्ध हवा व शुद्ध पाणी मिळणे हा प्रत्येक मानवाचा मूलभूत अधिकार आहे. आणि निसर्ग वाचविणे व टिकवणे हे प्रत्येक नागरिकाचे कर्तव्य आहे आणि त्यामुळेच म्हात्रे यांनी कासाडी नदीच्या संवर्धनासाठी दिलेला लढा कौतुकास्पद असंच आहे. त्यामुळे त्यांचा सन्मान करताना आम्हांला मनस्वी आनंद होत आहे. म्हात्रे यांच्या कडून प्रेरणा घेऊन देश पातळीवर अशा प्रकारचे शंभर अरविंद म्हात्रे तयार झाल्यास वसुंधरा फुलण्यास आणि बहरण्यास वेळ लागणार नाही. मात्र ही लढाई फक्त म्हात्रे यांची नसून समाजातील प्रत्येक घटकाची ती जबाबदारी आहे. असेही गायकवाड म्हणाले. अरविंद म्हात्रे यांनी जो दिल्ली येथे जाऊन गेली नऊ वर्ष कासाडी नदीच्या प्रदूषणा विरोधात जो खंबीरपणे लढा दिला आणि जिंकला याचा आम्हांला नेहमीच अभिमान राहील. आज १७ कोटी ४४ लाख रुपये नदीच्या संवर्धनासाठी खर्च होणार आहेत आणि नदीचे गत वैभव प्राप्त होणार असल्याने यासाठी म्हात्रे यांनी दिलेला लढा खरंच कौतुकास्पद असंच आहे. असे मत पनवेल प्रेस क्लबचे माजी अध्यक्ष व संस्थापक संतोष घरत यांनी यावेळी व्यक्त केले. सत्काराला उत्तर देताना अरविंद म्हात्रे म्हणाले कि, ऑक्सिजनची किती गरज आहे आणि तो किती किमती आहे हे समाजाने वेळीच ओळखायला हवे. समाजातील काही घटकांबरोबरच वेळोवेळी पत्रकार बांधवांनी दिलेली साथ यामुळेच आज हा सकारात्मक परिणाम पहावयास मिळत आहे. प्रसार माध्यमे हा लोकशाहीचा चौथा स्तंभ आहे. त्यामुळे माध्यमांनी याबाबत प्रखर भूमिका घेतल्यास समाजातील कोणतीही नकारात्मक बाब अधिक काळ टिकणार नाही. यावेळी संस्थेचे उपाध्यक्ष सागर पगारे , सचिव भागवत अहिरे, सहसचिव सुनील पाटील , खजिनदार शैलेश चव्हाण , सह खजिनदार प्रसाद परब तर संस्थेचे सदस्य विकास पाटील, प्रसिद्धी प्रमुख किरण बाथम, सुनील भुजबळ , निवृत्ती पाटील, रोहित घाडगे , अनिल पाटील उपस्थित होते

कार्यक्रमाचे सूत्र संचालन राजेंद्र सदावर्ते यांनी केले तर संस्थेचे सदस्य सल्लागार अविनाश पाटील यांनी उपस्थितांचे आभार मानले. हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी प्रसाद परब व अनिल पाटील यांनी विशेष मेहनत घेतली.

## खारघर वसाहतीतील खोदकामामुळे अपघाताचा धोका

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर )** : पावसाळ्यात रस्त्यावर पाणी साचू नये, वाहनचालकांना कोणत्याही अडचणी उद्‌भवू नये, यासाठी खारघर परिसरात कामे सुरू आहेत. त्यासाठी काही ठिकाणी रस्त्यावर खोदकाम करण्यात आले आहे, तर काही ठिकाणी काँक्रीटीकरणाची कामे सुरू आहेत, मात्र ही कामे संथ गतीने सुरू असल्याने नागरिक तसेच वाहनचालकांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. खोदकामामुळे वाहतूक कोंडीत भर पडत असल्यामुळे काम पूर्ण करण्याची मागणी खारघरवासीयांकडून होत आहे. पनवेल महापालिकेने लाखो रुपये खर्च करून खारघर परिसरातील मुख्य। रस्त्यावर काँक्रीटीकरण सुरू केले आहे. विशेष म्हणजे मे अखेर ही काम पूर्ण होणे आवश्यक असताना जून महिना तसेच पावसाळा सुरु झाला तरीही रस्त्याची कामे पूर्ण झालेले नाहीत. खोदकाम केलेले रस्त्यांमुळे वाहतूक कोंडी होत आहे.खारघरचे प्रवेशद्वार असलेल्या हिरानंदानी कडून उत्सव चौकाकडे जाणाऱ्या स्त्यावर वाहनाची वर्दळ असते, मात्र पालिकेकडून खारघर मुख्य चौकातील एका मार्गिकचे काम अपूर्णच आहे.डांबरीकरणाचे काम बंद आहे. मुख्य रस्त्यावरील काँक्रीटीकरणाचे काम सुरू आहे. त्या ठिकाणी वाहतूक कोंडी होणार नाही, याची काळजी घेतली जात आहे. अपूर्ण कामे लवकरात लवकर पूर्ण करण्याचा प्रयत्न आहे.संजय कटेकर, मुख्य शहर अभियंता, यांचे म्हणणे आहे तर बँक ऑफ इंडियाकडून हिरानंदानी पुलाकडे जाणाऱ्या रस्त्यांचे काम अपूर्ण आहे. अशीच अवस्था शिवमंदिरकडून घरकुल आणि डेली बाजाराकडे जाणाऱ्या चेरोबा मंदिर चौकाची झाली आहे. विशेष म्हणजे या ठिकाणी चार रस्ते आहे. चौकात एका बाजूला काँक्रीटीकरण झाले आहे, तर दुसऱ्या बाजूला खोदकाम करण्यात आले आहे. आठ महिन्यांपूर्वी बेलपाड्याकडून भारती विद्यापीठाकडे जाणारा रस्ता, उत्सव चौकाकडून सेंट्रल पार्ककडे जाणाऱ्या रस्त्यावरील काम अपूर्णच आहे. तरी अपूर्ण कामे लवकरात लवकर व्हावी अशी मागणी येथील रहिवाशी करीत आहेत .

## पांडवकड्याला इको-टुरिझमचा दर्जा द्या प्रकल्प विकसित करण्याची मुख्यमंत्र्यांकडे मागणी

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर )**

:खारघर टेकडीवर पावसाळी उत्सव साजरा करताना काही तरुण अडकल्याची घटना नुकतीच घडली आहे. पावसाळ्यात अनेक पर्यटक धबधब्यांकडे जातात आणि त्यांना थांबवता येत नाही. त्यामुळे सरकारने खारघर डोंगर परिसर इको टुरिझम आणि जलसंवर्धन प्रकल्प म्हणून विकसित करावा, अशी मागणी नॅटकनेक्ट फाउंडेशनने मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडे केली आहे. खारघरमध्ये विस्तीर्ण डोंगररांगांमुळे पर्यटक कुठूनही टेकड्यांवर जात असल्याचे खारघर हिलँड वेटलँड्स फोरमच्या ज्योती नाडकर्णी यांनी वन विभाग आणि स्थानिक अधिकाऱ्यांच्या निदर्शनास आणून दिले आहे. वन विभागाने पांडवकडा धबधब्यावर बंधारा उभारून पर्यटकांना कपडे बदलण्यासाठी खोली बांधली आहे; मात्र ही खोली धूळखात पडली आहे.

नैसर्गिक संपत्तीचे वरदान नॅटकनेक्ट फाउंडेशनचे पदाधिकारी बी. एन. कुमार म्हणाले, पांडवकडा हा धबधबा असताना स्थानिकांना लोणावळा-खंडाळा आणि माळशेज घाटावर जावे लागते. या शहराला खारफुटी, पाणथळ जागा, फ्लेमिंगो, टेकड्या, धबधबे, तसेच डोंगरांचे वरदान मिळाले आहे.

## पर्यावरणप्रेमींची डिजिटल मोहीम

खारघर आणि बेलापूरच्या डोंगरावरून पावसाचे पाणी साठवता येते. बेलापूर-खारघर डोंगरावर निसर्ग उद्यान प्रकल्पाचे पुनरुज्जीवन करावे आणि नवी मुंबईला इको-टुरिझम डेस्टिनेशन म्हणून विकसित करावे, अशी मागणी केली असून डिजिटल मोहीम सुरु केली आहे .

## पनवेल परिसरातील बाजारपेठेत रानभाज्यांची आवक वाढली

**दैनिक युवक आधार**

**पनवेल ( वार्ताहर )** : पावसाळा सुरू झाला की कधीही दिसणाऱ्या रानमेव्याने पावसाळ्यात मार्केट फुलून जाते. कुडू, टाकळा, शेवळे, भारंग, तेलपाट, ससेकांद अशा पाहुणेमंडळींनी सध्या भाजीमार्केट फुलून गेलाय. अनेकांनी तर यातील काही नावं ऐकलीही नसतील. पण हा आहे पावसाळ्यातला रानमेवा. फक्त पावसाच्या पाण्यावर फुलणारा अत्यंस सकस आणि पौष्टीक असा रानमेवा पनवेलमध्ये दाखल झाला आहे. या सगळ्या पालेभाज्या पाहून नॉनव्हेजीटेरीयन्स जरा खडू होतील पण त्यांच्यासाठीही पावसाळ्यात मार्केटमध्ये खुप चॉईस आहे. ऐन पावसाळ्यात येणाऱ्या या करंदा, अळू, हिरवे बिरडे, आळंबी, कुड्याच्या शेंगा, कुवली, बांबूचे कोंब यांची आवक बाजारात वाढली आहे कोणत्याही रासायनिक खता-औषधांशीवाय जंगलात रूजत असल्यामुळे हा रानमेवा खूपच चविष्ठ आणि तितकाच पौष्टीक असतो. पनवेल तालुक्यामधील बाजारात काही प्रमाणात रानभाज्या विक्रीसाठी यायला सुरुवात झाली आहे. या रानभाज्यामध्ये औषधी गुणधर्म असल्याने व रासायनिक विद्राव्यापासून मुक्त असणाऱ्या या रानभाज्या असल्याने त्यांची मोठ्या प्रमाणात विक्री होते. पावसाळा सुरू झाला की, पनवेल तालुक्यात आदिवासी भागातील डोंगरकपारी व घनदाट जंगलात राहणारा आदिवासी समाज आपल्या परिसरातील निरनिराळ्या रानभाज्या विक्रीसाठी शहरी भागात व तालुक्याच्या ठिकाणी घेऊन येत असतो. सध्या कर्टोली ही १६० रुपये किलोने विकण्यात येत आहे. व बाकीच्या भाज्या ह्या वाट्घाने दिल्या जातात. कॉली ही भाजी चढ्या भावाने विकली जात असली तरी या भाजीला सर्वाधिक मागणी आहे. कटॉली ही भाजी सध्या अनेक बागांमध्ये पिकवली जाते पण आदिवासी भागात दऱ्याखोऱ्यात पिकवलेल्या कर्टोली या भाजीला फार मोठी मागणी आहे. या सर्व भाज्या औषधी असल्यामुळे नागरिकांचा सर्वाधिक कल या भाज्या खरेदी करण्याकडे असतो. पनवेल तालुक्यात बहुतांश ठिकाणी पावसाच्या हलक्या सरींची बरसात झाली असून रानावनात झाडाझुडपांना, वेलींना पालवी फुटू लागली आहे. अशा वातावरणात बाजारात रानभाज्यांची आवक वाढली असून औषधोपयोगी म्हणून ग्राहकांकडून पसंती मिळत आहे. पावसाळा सुरू होताच रानभाज्यांना बहर येतो.

## पर्यावरण दिनानिमित्त शिवसेना पक्षाने कापडी पिशव्यांचे दुकानदारांना वाटप

**दैनिक युवक आधार**

**पनवेल वार्ताहर**

प्लास्टिक पिशव्यांमुळे पर्यावरणाला होणारा उपद्रव हा जगभरात एक मोठी समस्या निर्माण झाली असून ह्या समस्याला मुळापासून आळा घालण्यासाठी शिवसेना पनवेल पक्षाने आज 5000 कापडी पिशव्या खारघर सेक्टर 34 35 येथील दुकानदारांना मोफत वितरण केले. पनवेल महानगरपालिका आणि महाराष्ट्र शासनाने अगोदरच प्लास्टिक बंदीची घोषणा केली असून येणाऱ्या काळामध्ये दुकानदारांना प्लास्टिक बॅग मधून सामान दिल्यास दंड वसूल करण्याचे आदेश सर्वत्र दिले गेले आहेत. पर्यावरण आणि प्लास्टिक मुळे होणारा नैसर्गिक असमतोल टाळण्यासाठी शिवसेना महानगर संघटक मंगेश रानवडे यांच्या पुढाकारांनी व शिवसेना पनवेल पदाधिकारी इम्तियाज शेख, मुनाफ अमिराली, निवृत्ती सकपाळ, ज्योती नाडकर्णी, सौ नंदीता रॉय यांच्या समवेत कापडी पिशव्यांचा वितरण करण्यात आले.



## पत्रकार संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसानिमित्त , राज्यस्तरीय ऑफलाइन स्पर्धा परीक्षा गुणवंत विद्यार्थी चा सत्कार,

**दैनिक युवक आधार**

**वार्ताहर**

रक्तदान शिबिर, मोफत नेत्र तपासणी, व विविध सामाजिक क्षेत्रातील 76 कार्यकर्त्यांचा सत्कार सोहळा

9 जूनला शांतीवन बुद्ध विहार चिचाळ येथे होणार कार्यक्रमाचे आयोजन

माजी खासदार डॉ खुशाल बोपचे, मुख्य संपादक दशरथ सुरडकर, जटा टीव्हीचे निखिलेश कांबळे उपस्थित राहणार

- प्रेस संपादक व पत्रकार सेवा संघटनेचे राज्य सरचिटणीस व विदर्भ विभागीय दैनिक माझा मराठवाडा वर्तमानपत्राचे संपादक संजीव भांबोरे यांच्या वाढदिवसानिमित्त 9 जून 2025 ला दुपारी 3 वाजता राज्यस्तरीय घेण्यात आलेल्या ऑफलाइन सामान्य ज्ञान स्पर्धेत प्रथम ,द्वितीय ,तृतीय आलेल्या विद्यार्थ्यांचा सत्कार , विविध सामाजिक क्षेत्रातील 76 कार्यकर्ते त्यात प्रामुख्याने 55 कार्यकर्त्यांचा सन्मानचिन्ह ,सन्मान प्रमाणपत्र ,पुष्पगुच्छ व मानाचा फेटा बांधून सत्कार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे 21 सामाजिक कार्यकर्त्यांना भारतीय संविधान ,सन्मान प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सन्मानित करण्यात येणार आहे. कार्यक्रमाचे उद्‌घाटन दैनिक माझा मराठवाडा चे मुख्य संपादक दशरथ सुरडकर छत्रपती संभाजीनगर हे करणार आहेत ..तर कार्यक्रमाचे अध्यक्षस्थानी माजी खासदार तथा अखिल भारतीय ओबीसी बहुजन महासंघाचे राष्ट्रीय अध्यक्ष डॉ .खुशाल बोपचे हे राहणार आहेत. विशेष अतिथी म्हणून शिवशंकर मुंगाटे सरपंच अड्याळ तथा माजी उपसभापती पंचायत समिती पवनी, सहाय्यक पोलीस निरीक्षक धनंजय पाटील अड्याळ, संविधान संघर्ष समिती भंडारा जिल्हा चे अध्यक्ष रोशन जांभुळकर, जनता टाईम/ जनता टीव्हीचे मुख्य संपादक निखिलेश कांबळे नागपूर,शांतीवन बुद्ध विहार चिचाळ येथील संचालक जीवन बोधी बौद्ध नागपूर हे प्रामुख्याने उपस्थित राहणार आहेत.सदर कार्यक्रमात विविध सामाजिक क्षेत्रातील 70 कार्यकर्त्यांचा सत्कार करण्यात येणार आहे .त्यात प्रामुख्याने सदानंद धारगावे, अमरकंठ समरीत, अभय रंगारी, रूपचंद रामटेके ,रोशन जांभुळकर ,पंकज वानखेडे ,दुर्गेश राऊत ,प्राध्यापक राजेश नंदपुरे ,डॉक्टर अक्षय कहालकर ,गणेश पारधी, जीवन बोधी बौद्ध ,डी जी रंगारी ,डॉक्टर गणेश मेश्राम ,अशोक वाहने ,शिवशंकर मुंगाटे ,आशिष चेडगे, जयदेव देशमुख ,भावेश कोटांगले, नरेंद्र भाऊ कातोरे ,डॉअर्पण कुमार संघरत्ने,नम्रता बागडे, प्राध्यापक राहुल डोंगरे ,भीमराव टेंभुर्णे ,मनोज चिंचघरे, विजय नंदागवळी ,सतीश सोमकुवर ,दिलीप वानखेडे ,तुळसीराम गेडाम, पोर्णिमा साखरे ग्रामपंचायत अधिकारी अड्याळ, परशुराम दिघोरे, शंकर भेंडारकर,राजविलास गजभिये, लोकनाथ रायपुरे,सुनील सूर्यवंशी ,संजय वंजारी ,कुलदीप गंधे ,विलास बांडेबुचे, गुलाब घोडसे, अर्पित मेश्राम, भैयालाल मेश्राम ,अनिल चचाने ,विनय ढोके,प्रशांत बोदेले ,तनुजा नागदेवे, विपिन टेंभुर्णे, विकास टेंभुर्णे ,अमोल थुलकर ,यांच्या समावेश आहे. व राज्यस्तरीय ऑफलाइन स्पर्धेत प्रथम क्रमांक अंकित वसंता लोंदासे , विलास दुर्गेश लोंदासे , सुमेध खुशाल खोपे यांचा सुद्धा सत्कार करण्यात येणार आहे. त्याचप्रमाणे 21 कार्यकर्त्यांना भारतीय संविधान पुस्तक, सन्मानचिन्हे ,प्रमाणपत्र व पुष्पगुच्छ देऊन सत्कार करण्यात येणार आहे. त्यात प्रामुख्याने नासिकचवरे , श्रीकांत नागदेवे, सोहेल खान ,राजेश मेश्राम , मनोज गेडाम ग्रामपंचायत अधिकारी पहेला, राजकुमार राऊत ,पत्रकार विशाल रणदिवे,धनंजय मुलकरवार, प्राध्यापक सुरज सुरज गोंडाने,तलाठी रवींद्र हटवार ,प्राध्यापक शेखर बोरकर, ग्रामसेवक शालिक लुटे, विक्रांत भालाधरे, पत्रकारशशिकांत भोयर, मुनेश्वर बोदलकर, पत्रकार प्रवीण तायडे, पत्रकार संजय दांडगे, पत्रकार जयश्री सोनवणे, पत्रकार गोकुळ सिंग राजपूत, यांचा समावेश आहे .सकाळी 10 ते 2 वाजेपर्यंत समर्पण ब्लड बँक भंडारा यांच्या वतीने रक्तदान शिबिराचे आयोजन व नेत्रसेवा हॉस्पिटल भंडारा यांच्या वतीने मोफत नेत्र तपासणी शिबिराचे आयोजन पवनी तालुक्यातील शांतीवन बुद्ध विहार चिचाळ येथे अर्पित मेश्राम व मित्र परिवारातर्फे करण्यात आलेले आहे. करिता कार्यक्रमाचा लाभ घेण्याचे आवाहन आयोजका तर्फे करण्यात आलेले आहे.



## अभिष्टचिंतन.. आत्मचिंतन...

०६ जून

पत्रकार साबीर भाई...



गुरू ,मार्गदर्शक,मित्र व परिवार म्हणून एक संघटित राहू या मानसिकतेत जीवन जगण्यात महत्व देणारा सामन्य माणूस..

अभियांत्रिकी,व्यवसायिक, पत्रकारिता करीत राज्याच्या राजकीय पदावर सक्रिय राहणारा कट्टर भारतीय मुस्लिम मनाचा देशवासी .. सामाजिक,पारिवारिक, कर्तव्ये दक्ष राहून आपआपल्या जवाबदारी संवेदनशील मनाने पूर्ण करण्यासाठी सक्रिय राहणारा कुटुंबातील पालक पिता .. वयाच्या पुढच्या टप्प्यात पदार्पण करताना प्रत्येक दिवस एक नवीन संधी घेऊन येत असताना जीवनातील सर्व कर्तव्ये पूर्ण व्हावी म्हणून सहकारी मित्र परिवार,मार्गदर्शक म्हणून सदैव सोबत राहिली याच समाधान बाळगत प्रोत्साहित करणार आलेख बदलणार जीवनातील एक महत्वाचा क्षण.. काय कमावलं.. काय गमावलं या पेक्षा काय करू शकतो ,समजू शकतो,घडवू शकतो,देऊ शकतो,बदलू शकतो,सांगू शकतो,आत्मसात करून समाज देश पिढीला सकारात्मक विचारांची साथ मिळावि म्हणून केलेलं नियोजन. आयुष्यात संपर्कात येणाऱ्या व्यक्ती पासून ,सामाजिक व्यासपीठावर असणाऱ्या हजारो ओळखीच्या व्यक्ती च्या मनांवर संस्कृती, समाज व देश म्हणून कस एक मन,एक विचाराने देशनिष्ठ कसं होऊ हे सांगण्याच आयुष्याचा शुद्ध मन अपेक्षा व विचार मांडण्याचा एक संघर्षमय प्रवास.. जेष्ठ, तज्ञ, वरिष्ठ, नामदार, नेते ,गुरू यांच्या संगतीत सोबत संघर्षमय प्रयास केला याच समाधान व अभ्यास जीवनात महत्वाचा टप्पा .

देश म्हणून लोकशाहीची चिंता तर संविधान म्हणून हक्क अधिकारांची पायमल्ली न व्हावी म्हणून पत्रकारिता करताना लोकांच्या मनातील प्रश्न निःपक्षपाती पणे मांडण्यासाठी लेखणी उचलली त्यात स्वतःला एक ओळख निर्माण करून समाजात अनेक हित शत्रू ,मित्र,गुरू,सहकारी , साथीदार मिळतात, कधी मन जुळली कधी विचार कधी वैचारिक विभिन्नता अनुभवली तर कधी परिस्थिती नुसार तडजोड पहायला मिळाली. अनुभवातुन एवढंच समजलं की आपला उपयोग जर आपल्या योग्यतेने समाजाला देशाला झाला की आपल्याला मान ,सन्मान मिळतो .त्यातून काही जास्त विचार न करता एकच ठरवलं की कर्म धर्म समजून व्यस्त आणि मस्त रहायच जीवनाचा प्रवास नवं काही संशोधन करून धंनशोधन करायचं आणि काहितरी जगाला विशेष देता येईल या साठी जगायच असा जीवन उद्देश.. आत्मचिंतन अभिष्टचिंतन निमित्ताने लोक उपयोगी उपक्रम राबवायचे हा जीवन व त्यातील सर्व सहकारी वर्गाच्या साथीने सुखी ,समृद्धी ,नियोजित व संघटित जीवन जगायच.

अंतिम श्वास पर्यंत आपल्या असण्याने जगाला काही आपला उपयोग होईल यासाठी प्रयास करायचा मातृत्व व मातृभूमीच्या ऋणांना सदैव लक्षात ठेवून आपल्याच सावलीपासून

आपण शिकायच ..कधी लहान तर कधी मोठं होऊन जगायच" सदैव हसतमुख, प्रभावी व कर्तव्यदक्ष , मार्गदर्शक, असे बहुआयामी संकल्प ठेवून नव्या दिशा प्रत्येक स्वप्न पूर्ण करीत सुख, समृद्धी, समाधान, दिर्घायुष्य, आरोग्य मिळावायच . ईश्वर आल्हा कडे जग कल्याण व्हावे ही प्रार्थना व आपल्या सर्व हित चिंतक मित्र परिवाराचे मनापासून आभार करावे असे ऋणी मनाच्या गोड भावना...

*पत्रकार साबीर भाई शेख* या

*त्वदीये जन्मदिवसे वयं सुहितचिन्त्काःअर्पयामो शुभाशंसाः स्वीकुरुष्व सुखी भव ।। जन्मदिनशुभेच्छाः।।*

## लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त माजी उपमहापौर सिताताई पाटील यांच्या कडून गरिब महिलांना साडी वाटप

**दैनिक युवक आधार**

**राजेंद्र कांबळे**

**खांदा कॉलनी**

लोकनेते माजी खासदार रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त खांदा कॉलनीत झोपडपट्टी व आदिवासी परिसरात माजी उपमहापौर सिताताई पाटील यांच्याकडून गरीब महिलांना साडी वाटप करण्यात आले यावेळी त्यांचे सांमवेत भाजप महिला पदाधिकारी उपस्थित होत्या पनवेल मध्ये दरवर्षी लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध कार्यक्रमाचे आयोजन केले जाते अनेक प्रभागामध्ये लोकनेते रामशेठ ठाकूर यांच्या वाढदिवसानिमित्त विविध सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन केले जाते यानिमित्त दरवर्षी माजी उपमहापौर सिताताई सामाजिक कार्यक्रमाचे आयोजन करतात यावेळी त्यांनी खांदा कॉलनी सेक्टर 13 मधील झोपडपट्टी मधील गरिब महिलांना साडी वाटप व जेष्ठ नागरिकांना शर्ट पीस वाटप केले यावेळी भाजप महिला पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होत्या










## शिवसेना शाखा क्र. १९४ च्या वतीने प्रभादेवीत ५ वी ते १० वीच्या शालेय विद्यार्थ्यांना मोफत दप्तर वाटप

**दैनिक युवक आधार**

**रमेश पाटील**

**मुंबई (प्रतिनिधी)** –







शिवसेना शाखा क्र. १९४ च्या वतीने प्रभादेवी येथे विद्यार्थ्यांच्या शैक्षणिक गरजा लक्षात घेऊन ५ वी ते १० वीच्या विद्यार्थ्यांसाठी मोफत शालेय दप्तर वाटपाचा उपक्रम पार पडला. कार्यसम्राट, शिवसेना उपनेते व श्री सिद्धिविनायक गणपती मंदिर न्यासाचे अध्यक्ष (राज्यमंत्री दर्जा) मा. आमदार श्री. सदा सरवणकर यांच्या मार्गदर्शनाखाली व मा. नगरसेवक समाधान सरवणकर यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबवण्यात आला.

मान्यवरांची विशेष उपस्थिती या कार्यक्रमास शिवसेना सचिव व महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाचे अध्यक्ष श्री. सिद्धेश कदम, शिवसेना उपनेत्या व प्रवक्त्या श्रीमती शितल म्हात्रे, महिला विभाग प्रमुख श्रीमती प्रिया गुरव-सरवणकर व विभाग प्रमुख श्री. निशिकांत पाठारे यांची प्रमुख उपस्थिती लाभली. त्यांनी विद्यार्थ्यांना शुभेच्छा देत अशा समाजोपयोगी उपक्रमांचे कौतुक केले.

पालकांचा भरघोस प्रतिसाद कार्यक्रमात परिसरातील शेकडो विद्यार्थी व त्यांच्या पालकांनी मोठ्या उत्साहाने सहभाग घेतला. अनेक पालकांनी समाधान सरवणकर यांच्या या उपक्रमाबद्दल आभार मानले. शिक्षणासारख्या मूलभूत गरजेबाबत जागरूकता निर्माण होणे ही काळाची गरज असल्याचेही मत व्यक्त करण्यात आले. “विद्यार्थ्यांचे शिक्षण हेच समाजाच्या प्रगतीचे साधन आहे. विद्यार्थ्यांच्या अडचणी लक्षात घेऊन आम्ही नेहमीच अशा उपक्रमांची रचना करत राहू.” असे नगरसेवक समाधान सरवणकर यांनी आपल्या भाषणात सांगितले.

सिद्धी प्रिंटर्स
दैनिक,सायंदैनिक, साप्ताहिक, मासिक, इत्यादी
वर्तमानपत्राचे सर्व साइज मधे ब्लॅक, कलर व ४कलर
प्रिंटींग वाजवी दरात करुन मिळेल.
वर्तमान पत्राचे सर्व साईज मधे आकर्षक डिझाईन मध्ये
डीटीपी करून मिळेल
Call 9028240020 ,9220403509

# आदई डोंगरावर वृक्षारोपण

**दैनिक युवक आधार**
**नवीन पनवेल वार्ताहर** : ५ जून जागतिक पर्यावरण दिवसा निमीत्त आज आदई डोंगर पनवेल येथे कृष्ण रुख्मिणी ट्रस्ट तर्फे वृक्षारोपण केले.

निरोगी पर्यावरण, निरोगी मानव, जीवन आरोग्य यांचा घनिष्ठ संबंध आहे. शुध्द,सुरक्षित व सजीव पर्यावरण हे निरोगी जीवनासाठी अत्यंत आवश्यक आहे.जर पर्यावरण प्रदूषित असेल तर त्याचा थेट व अप्रत्यक्ष परिणाम मानवाच्या आरोग्यावर होतो,हे सिद्ध झाले आहे. एक मोठा संदेश पाणी, झाडे, वीज, कागद वाचवा, वाहना ऐवजी सायकलचा वापर तसेच कचरा पेटीचा ही करा. टाकावू वस्तूंचे रिसायकल होणे गरजेच आहे. प्लास्टिकचा वापर टाळून तुम्ही पृथ्वीला मदत करु शकता. यावेळी उत्तम ढेबे यांच्या नेतृत्वात डॉ कृष्णा देसाई बोराटे, तळेकर,कृष्णकुमार, सिद्धी देसाई, पोतदार इ.यांनी सहभागी होवुन स्वतः झाडे लावली.





पाटोदा तालुका पत्रकार संघाचे हल्ला विरोधी कृती समितीचे अध्यक्ष शेख अजिज व पाटोदा तालुका पत्रकार संघाचे सोशल मिडिया अध्यक्ष शेख महेशर यांच्या वाढदिवसा निमित्त सत्कार करुन शुभेच्छा देताना. पाटोदा तालुका पञकार संघाचे संस्थापक अध्यक्ष श्री.सोमिनाथ कोल्हे, पाटोदा नगर पंचायतचे नगराध्यक्ष श्री.राजु भैय्या जाधव, नगरसेवक श्रीहरी गिते बापु, श्री.विशाल आरसुळ सर, पत्रकार संघाचे सचिव अँड.महेश बेदरे, पत्रकार श्री.सुधीर एकबोटे, श्री.जितेंद्र भोसले, प्रेस फोटोग्राफर राहुल सोनवणे सह इतर

(छाया - दैनिक युवक आधार पाटोदा.)

# गेल कंपनीचा कोट्यवधींचा सीएसआर निधी 'टक्केवारीच्या' वादात अडकला; रुग्णालयाच्या विकासाला ब्रेक ?

**दैनिक युवक आधार**
**निलेश फुंडे रेवदंडा**
टक्केवारीच्या वादात वाया जाणार गेल कंपनीचा कोट्यवधींचा सीएसआर निधी; बांधकाम विभाग आणि आरोग्य यंत्रणांमध्ये समन्वयाचा अभाव!

अलिबाग जिल्हा सामान्य रुग्णालय, अलिबाग येथील गेल इंडिया कंपनीच्या सीएसआर निधीतून कोट्यवधी रुपयांची कामे मंजूर असूनही अधिकाऱ्यांच्या आडमुठ्या निर्णयामुळे ती निधीच वाया जाण्याची शक्यता आहे, असा गौप्यस्फोट माहिती अधिकार कार्यकर्ते संजय गंगाराम सावंत यांनी केला आहे.सावंत यांनी यासंदर्भात सार्वजनिक बांधकाम विभागाने राष्ट्रीय आरोग्य अभियानाच्या उप अभियंत्यांना पाठवलेले खळबळजनक पत्र प्रसारमाध्यमांसमोर सादर केले आहे. या पत्रात जिल्हा रुग्णालय आवारातील




१० कामांना नवे ड्रेनेज सिस्टीम, गटारे, अंतर्गत रस्ते, कंपाउंड वॉल, मुख्य प्रवेशद्वार आदींसाठी परवानगी नाकारल्याचे स्पष्टपणे नमूद आहे.कामे एनआरएचएम विभागामार्फत करण्याचा जिल्हा शल्यचिकित्सकांचा निर्णय बांधकाम विभागाच्या नजरेतून चुकीचा ठरवण्यात आला असून, "सदर कामांमुळे भविष्यात येणाऱ्या अडचणींसाठी आपण जबाबदार राहाल," असा स्पष्ट इशाराही पत्रात दिला आहे. त्यामुळे गेलच्या सीएसआर निधीचा वापर न होता कोट्यवधींची तरतूद अधांतरीच राहिली आहे.बांधकाम विभागाची भूमिका स्पष्ट करताना म्हटले आहे की, "जिल्हा रुग्णालयातील सर्व इमारती या पीडब्ल्यूडीच्या अखत्यारीत असून, कोणतीही दुरुस्ती अथवा बदल फक्त या विभागाच्या संमतीनेच होऊ शकतो. मात्र, याच नियमांचे उल्लंघन करत आरोग्य विभागाने ब्लड बँक व मोटर गॅरेज इमारतींवर अतिरिक्त मजले उभारले, याची परवानगी घेतलीच नाही."या वादात दोन्ही विभागांनी एकमेकांवर बोट ठेवले असले तरी, परिणामी रुग्णालयाच्या अत्यावश्यक सुविधा अद्याप रखडल्या असून, गेल सारख्या कंपनीचा सामाजिक जबाबदारीसाठी दिला गेलेला निधी अशा प्रशासकीय कुरघोड्यांमुळे वाया जाण्याच्या मार्गावर आहे.

"जिल्हा रुग्णालयाचे संपूर्ण आवार आणि त्यातील इमारती यांची देखभाल व दुरुस्ती ही पूर्णतः सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अखत्यारीत येते. या सर्व इमारती पीआरबी रजिस्टरमध्ये नोंदवलेल्या असल्याने त्यात कोणताही बदल वा नवीन काम सुरू करण्यास बांधकाम विभागाची परवानगी आवश्यक आहे. असे असतानाही जिल्हा शल्यचिकित्सक कार्यालयाने नियम धाब्यावर बसवून ही कामे राष्ट्रीय आरोग्य अभियानाकडे वर्ग केली, हे अत्यंत संशयास्पद आणि नियमबाह्य आहे."
**– संजय गंगाराम सावंत, सामाजिक कार्यकर्ते, अलिबाग**

"अलिबाग येथील जिल्हा सामान्य रुग्णालय आवारातील १० कामे – ज्यामध्ये संपूर्ण रुग्णालयाची ड्रेनेज सिस्टीम नव्याने तयार करणे, गटारे बांधणे, अंतर्गत रस्ते, कंपाउंड वॉल, मुख्य प्रवेशद्वार इत्यादी कामांचा समावेश आहे – ही सर्व कामे एनआरएचएम विभागामार्फत करण्यासाठी परवानगी मागण्यात आली होती. मात्र सार्वजनिक बांधकाम विभागाने या कामांना स्पष्टपणे नकार दिला आहे. त्यामुळे हा विषय सध्या थांबवण्यात आला आहे."
**– मच्छींद्र कटरे, उप अभियंता, राष्ट्रीय आरोग्य अभियान**

# खोपोली शहरात नागरी समस्यांचा भडमार

## आम आदमी पार्टीने भरवले तक्रारी व समस्यांचे प्रदर्शन

दैनिक युवक आधार
खोपोली वार्ताहर
खोपोली शहरात प्रचंड प्रमाणात नागरी समस्या वाढलेल्या आहेत. गटारे साफ होत नाहीत, आठ आठ दिवस गटारांमधून कचरा काढून रस्त्यावर ठेवला जातो व तो उचलला जात नाही. दोन दोन महिने नगरपरिषदेचा पाणीपुरवठा सुरळीत होत नाही, शहराला फक्त एकच वेळ पाणी पुरवठा केला जातो, त्यातूनच शहराची तहान भागवावी लागते. तीन-तीन दिवस शिळफाटा भागात पाणीपुरवठा होत नाही व कोणत्याही प्रकारची ASघाणीचे साम्राज्य शहरात प्रचंड प्रमाणात वाढलेले आहे, सफाई होत नाही, घंटागाडी येत नाही, अशा एक ना अनेक समस्या नागरिकांना भेडसावत आहेत. गटारी तुटलेल्या आहेत, रस्त्यांवर प्रचंड प्रमाणात खड्डे पडले आहेत, भुयारी गटार योजनेसाठी खोदलेली रस्ते अजून दुरुस्त करण्यात आलेली नाहीत, दवाखान्यात औषधे उपलब्ध नाहीत, शाळांची बिकट अवस्था आहे अशा प्रचंड समस्या खोपोली नगरपरिषद प्रशासना बाबत नागरिकांच्या आहेत. शहरात विजेचा प्रचंड लपंडाव सुरू आहे. महावितरण चे अधिकारी अजिबात लक्ष देत नाहीत. नागरिकांच्या तक्रारीला केराची टोपली दाखवली जाते. रस्त्याच्या मध्यभागी असलेले खांब हलवण्यासाठी कोणतेही उपाययोजना केली जात नाही. खालापूर तालुक्यात एकही कार्डियाक अम्बुलन्स उपलब्ध नाहीये त्याबाबत वारंवार पाठपुरावा करून सुद्धा तहसीलदार कार्यालयातर्फे उदासीनताच पाहायला मिळत आहे. खोपोली शिळफाटा येथील नागरिक दररोज होणाऱ्या वाहतूक कोंडी पासून त्रस्त आहेत. त्याकरिता आम आदमी पार्टी उपोषण करू शकते परंतु नगरपरिषद प्रशासन किंवा तहसीलदार कार्यालय त्याकडे लक्ष देत नाही. त्यांना वाहतूक कोंडी दिसत नाही का ? असा नागरिकांचा सवाल आहे. या सर्व समस्यांबद्दल आवाज उठवण्याकरिता आम आदमी पार्टी प्रशासनाबरोबर पत्र व्यवहार निवेदने देत असते परंतु उत्तरे मिळत नाही त्यामुळे आम आदमी पार्टीने खोपोली शहरात नागरिकांपर्यंत आपल्या समस्या व तक्रारी पोहोचवण्याकरिता अनोख्या पद्धतीने आंदोलन केले. डॉ. बाबासाहेब आंबेडकर यांनी सांगितले आहे शिका संघटित व्हा आणि संघर्ष करा. नागरिकांनी कोणत्याही दबावाला न जुमानता, तुम्हाला भेडसावणाऱ्या समस्यांना वाचा फोडा व तुमच्या समस्या हे प्रशासनापर्यंत पोहोचल्याच पाहिजे त्यासाठी आम आदमी पार्टी एक सक्षम माध्यम म्हणून उभी आहे, असे आप प्रदेश संघटन सचिव डॉ. पठाण यांनी सांगितले. सदर आंदोलनात आम आदमी पार्टी खोपोली शहर अध्यक्ष ग्यासुद्दीन खान, शहर उपाध्यक्ष विवेक वाघमारे, शहर सचिव चंद्रप्रकाश उपाध्याय व अन्य सहकाऱ्यांनी उत्स्फूर्त सहभाग नोंदवला.




# जिल्हा परिषद शाळेला माध्यमिक शाळेचा दर्जा द्या.

**रहिमाबाद येथील शालेय समितीसह ग्रामस्थांचे गटशिक्षणाधिकारी यांना निवेदन**

**दैनिक युवक आधार**
**प्रतिनिधी :- योगेश पालोदकर**
**सिल्लोड** :- रहिमाबाद येथील निजामकालीन केंद्रीय प्राथमिक जिल्हा परिषद शाळेचा दर्जा वाढ करून शाळेत माध्यमिक शाळा सुरु करण्याची मागणी शालेय व्यवस्थापन समिती व ग्रामपंचायत प्रशासनाने ठराव पास करुन सिल्लोड पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी कार्यालयात सोमवारी (ता.०२) दाखल करण्यात आला. रहिमाबाद येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेची स्थापना १९५२ मध्ये झाली मात्र याठिकाणी गेल्या बहात्तर वर्षापासुन केवळ आठवी पर्यंतची शाळा आहे. गावात पुढील शिक्षणाची सोय नसल्याने अनेक विद्यार्थ्यांनी शिक्षण अर्धवट सोडून दिले. त्यामुळे अज्ञानतेचे प्रमाण जास्त आहे.यामध्ये मुलींचे प्रमाण जास्त आहे व गावात कोणत्याच खासगी शिक्षण संस्था नसल्याने विद्यार्थ्यांना माध्यमिक व उच्च शिक्षणासाठी बाहेर गावी पायपीट करावी लागते. यामध्ये अनेकदा बरेच पालक आपल्या मुलींना बाहेर गावी शिक्षणासाठी पाठवण्यास नकार देऊन त्यांना पुढील शिक्षणापासून वंचित ठेवतात. गावाची लोकसंख्या सात हजाराच्या वर असतांनाही गावात माध्यमिक शाळेची सोय नसल्याने अनेकदा विद्यार्थ्यांना माध्यमिक शिक्षणासाठी बाजुच्या गावात ऊन वारा पावसाचा मार सहन करीत उपाशी तापाशी पायपीट करित वेळेत शाळा गाठावी लागते यामध्ये अनेक विद्यार्थी हे गावाच्या वाड्या वस्त्यावर वास्तव्यास आहेत त्यांना पावसाळ्यात अनेकदा ओढे नाले यांना आलेल्या पुरामुळे शाळा बुडवावी लागते.चालु शैक्षणिक वर्षात इयत्ता नववीचा वर्ग सुरू करण्याबाबत शिक्षण विभागाने दखल घेऊन इयत्ता नववीचा वर्ग सुरु करण्याची मागणी शालेय व्यवस्थापन समिती केली आहे. तसेच नववीचा वर्ग गावात न सुरु झाल्यास पुढील शिक्षणावर बहिष्कार टाकण्याचा इशारा विद्यार्थ्यांच्या पालकांनी दिला आहे.

रहिमाबाद गावात निजामकालीन जिल्हा परिषदेची शाळा आहे मात्र तेव्हा पासुन केवळ प्राथमिक शिक्षण विद्यार्थ्यांना उपलब्ध होते. मात्र माध्यमिक शिक्षणाची सोय गावात नसल्याने अनेकदा विद्यार्थीनी व विद्यार्थी माध्यमिक शिक्षणापासून वंचित राहतात. चालु शैक्षणिक वर्षापासुन शाळेत माध्यमिकचे वर्गवाढ केल्यास विद्यार्थी शिक्षणाच्या प्रवाहात कायम राहतील.
**जयराम पाटील चिंचपुरे**
**कृषी उत्पन्न बाजार समिती संचालक सिल्लोड.**

जिल्हा परिषद शाळेत इयत्ता नववीचा वर्गवाढ करण्यासंदर्भात सिल्लोड पंचायत समितीच्या गटशिक्षणाधिकारी यांच्या कडे प्रस्ताव दाखल केला असुन चालु शैक्षणिक वर्षात माध्यमिकचे वर्ग सुरु केल्यास विद्यार्थी हिताचा निर्णय होऊन विद्यार्थ्यांची शैक्षणिक हेळसांड थांबेल.
**-अमोल तोंगल**
**अध्यक्ष शालेय व्यवस्थापन समिती**
**रहिमाबाद**

# वृक्षरोपन करून जागतीक पर्यावरण दिन साजरा

**दैनिक युवक आधार**
**प्रशांत तांबोळकर लातुर**
**शिरूरआनंतपाळ :**
येरोळ ता.शिरूरआनंतपाळ येथील जिजामाता मा.व उच माध्यमीक विद्यालयात विविध औषधीयुक्त व मानवाच्या उपयोगी फळझाडांचे वृक्ष रोपण करण्यात आले.

येरोळ येथील जिजामाता मा.व उच्च माध्यमीक विद्यालयाच्या प्रांगनामध्ये जागतीक पर्यावरण दिनाचे औच्यित्य साधुन प्राचार्य बालाजी महावरकर यांच्या हस्ते वृक्षरोपन करण्यात आले.

यावेळी विविध औषधउपयोगी असलेल्या एकुण ५१ झाडाचे वृक्षरोपन करण्यात आले. याप्रसंगी प्रा.अभय येरोळकर, एन.डी.बिरादार, सहशिक्षक डी.आर.चौसष्टे सेवीका उज्वला वाघमारे यांच्यासह विद्यालयातील विद्यार्थी पालक पर्यावरणप्रेमी नागरिक आदी उपस्थित होते.




# अज्ञात चोरटयांनी २ लाख रुपयांची रोख रक्कम केली लंपास

**दैनिक युवक आधार**
**पनवेल ( वार्ताहर )**
: घर कामासाठी बँकेतून दोन लाख रुपये काढून घरी जात असताना, चहा पिण्यासाठी थांबलेल्या एका इसमाच्या गाडीच्च्या डीकीतून अज्ञात चोरट्याने २ लाख रुपयांची रोख रक्कम लंपास केल्याची घटना पनवेल शहरातील उरण नाका रोडवर घडली आहे. सुरेंद्र जितेकर यांनी घर कामासाठी २ लाख रुपये बँकेतून काढले होते. काढलेले पैसे त्यांनी रेनकोट मध्ये गुंडाळून मोटारसायकलच्या डिकीत ठेवले होते. घरी जात असताना उरण नाका रोडवर, एमएसईबी ऑफिसजवळ आल्यावर सुरेंद्र हे चहा पिण्यासाठी गेले, मात्र आपण गाडीची चावी काढायची विसरल्याचे लक्षात आल्यावर त्यांनी तत्काळ गाडीजवळ धाव घेतली असता त्यांना गाडीची चावी मिळून आली नाही. तसेच गाडीची डिकी उघडलेल्या अवस्थेत आढळली, रेनकोटमध्ये गुंडाळून ठेवलेली रक्कम न आढळल्याने त्यांनी पनवेल पोलिसात तक्रार दाखल केली आहे.

# समस्त कक्कय्या समाज महासंघाचे ८जून रोजी मुबंईत कार्यकर्ता मार्गदर्शन शिबीराचे आयोजन..!

**दैनिक युवक आधार**
**मुंबई प्रतिनिधी-**
**गुरुनाथ तिरपणकर**
समस्त कक्कय्या समाज महासंघ यांच्या २०२५ या रौप्य महोत्सवी वर्षाचे मंगलमय औचित्य साधून कार्यकर्ता मार्गदर्शन शिबीर आणि सामाजिक मंडळाच्या चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले आहे.सदर चर्चा सत्राचे आयोजन ८जून २०२५रोजी मुंबईत करण्यात आले आहे. यावेळी ढोर व कक्कया समाजाच्या सर्वांगीण विकासासाठी संपूर्ण महाराष्ट्रात कार्यरत असलेल्या संघटना / मंडळे / संस्था / फाऊंडेशन इत्यादींच्या पदाधिका-यांना उपस्थित राहून चर्चा सत्रात भाग घेण्यासाठी विनंती करण्यात आली आहे. सदर कार्यक्रम रविवार दिनांक ८ जून २०२५ रोजी सकाळी १०.०० वाजता राजर्षि शाहू महाराज सभागृह, ३रा मजला, (छत्रपती शिवाजी महाराज नाटयगृहाच्या) न. चि. केळकर रोड, दादर (प), मुंबई-४०००२८, येथे करण्यात आले आहे. या चर्चा सत्रात पुढील विषयावर विचार मंथन करुन पुढील दिशा ठरविण्यात येणार आहे.


१) २०२५ या मंगलमय रौप्य महोत्सवी वर्षाचा भव्य दिव्य सोहळा साजरा **करणे.**

२) २०२५ ची मंगलमय रौप्य महोत्सवी "स्मरणिका " काढणे.

३) २०२५ या मंगलमय रौप्य महोत्सवी वर्षा निमित्त महाराष्ट्र, कर्नाटका, आंध्र, गुजराथ इ. राज्य व देश पातळी वरील कक्कय्या ढोर समाजाचे मुंबई येथे ऑक्टोंबर, नोव्हेंबर २०२५ मध्ये भव्य दिव्य अधिवेशन घेणे.

४) संत शिरोमणी विरशैव कक्कया महाराजांचा पुर्णाकृती पुतळयासह भव्य स्मारक मुंबई येथे बांधून देणे.

५) तत्कालीन मा. मुख्यमंत्री, श्री. एकनाथरावजी शिंदे साहेब यांनी संत कक्कय्या आर्थिक विकास महामंडळ या समाजासाठी देऊ अशी अधिवेशनात घोषणा केली होती. त्या घोषणेची अंमलबजावणी शासन निर्णय पारित करून




अद्याप झालेली नाही. ती त्वरीत करण्यात यावी.

६) ढोर कक्कय्या समाजातील थोर स्वातंत्र सेनाने, हरियाणा व उत्तर प्रदेशचे तत्कालीन राज्यपाल आणि मुंबई प्रांताचे मंत्री स्वर्गीय गणपतरावजी देवजी तपासे साहेब यांचे देशासाठी मौलीक योगदान असल्याने त्यांचे स्मारक शासनातर्फे उभारण्यात यावे.

७) देशाच्या पहिल्या हंगामी लोकसभेचे खासदार आणि नंतर सलग तीन वेळा खासदार म्हणून निवडून आलेले तसेच आमदार कै. मा. श्री. तायप्पा हरि सोनावणे हे ढोर कक्कय्या समाजाचे प्रतिनिधी होते. व त्यांनी युनो मध्ये शासनाचे प्रि केले होते. अशा लोक नेत्याचे स्मारक शासनातर्फे उभारण्यात यावे.

८)माजी आमदार, लेखक, नाटककार, दिग्दर्शक, निर्माते, साहित्यीक, चित्रपट कलाकार तसेच दलित मित्र पुरस्काराने गौरवण्यात आलेले स्वातंत्र सैनिक, समाज सुधारक, स्वर्गीय नामदेवरावजी व्हटकर. कै. नामदेवरावजी व्हटकर हे ढोर कक्कय्या समाजाचे लोकप्रिय नेते असून सुध्दा डॉ.बाबासाहेब आंबेडकर यांच्या महापरिनिर्वाण यात्रेचे संपूर्ण चित्रीकरण त्यावेळचा अतिशय विपरित काळामध्ये केले. यासाठी पैसा अडका नसल्याने स्वतःचा प्रिन्टींग प्रेस गहाण ठेऊन कर्ज काढले व असे महान कार्य केले.

९) कै. मा. आमदार गणपतराव सोनवणे हे सलग सन १९५२ ते १९६७ असे ३ वेळेस आमदार होते.त्यांचे कार्य समाजासाठी मौल्यवान होते. या सर्वांचे स्मारक उभारून नव्या पिढीला याची जाणीव करुन देण्यासाठी, समाज पुन्हा एकत्रित आणण्यासाठी,

आदी विषयावर चर्चा आणि विचार मंथन होणार असून यासाठी संत कक्कय्या समाजातील बांधवानी मोठया संख्यने उपस्थित राहून यात आपला सहभाग नोंदवावा असे समस्त कक्कय्या महासंघ यांच्या वतीने अध्यक्ष श्री निवृत्ती सावळकर, कार्याध्यक्ष श्री मारुती सदाफुले, सरचिटणीस श्री प्रकाश दरवेशी यांनी प्रसिद्धीस दिलेल्या पत्रकात म्हटले आहे.

# ७ वर्षाच्या युवराज सांगळे ने साडेतीन तासात केले सर कळसूबाई शिखर

**दैनिक युवक आधार**
**निफाड प्रतिनिधी राहुल कुलकर्णी**
शिवडी येथील युवराज सांगळे लहान वयात केले कळसुबाई शिखर सर महाराष्ट्रातील सर्वात उंच शिखर असलेल्या कळसूबाई शिखर हे १६४६ मीटर उंच म्हणजेच ५४०० फुट उंच समुद्र सपाटीपासून उंच आहे नाशिक इगतपुरी महामार्गावरील घोटी या गावापासून घोटी भंडारदरा रस्त्याने गेल्यास बारी हे गाव लागते .बारी हे गाव कोळी महादेव या आदिवासी जमातीचे आहे .या गावापासून कळसुबाई शिखरावर जाण्याचा मार्ग आहे. बारी गावातून यांची उंची ९०० मीटर आहे.यातील अर्ध्या उंची पर्यंत गावकऱ्यांनी पाय-याची शेती केलीली आहे. कठीण अशा कातळ टप्प्यावर शिडी बसवलेली असल्याने ३ ते ४ तासात कळसूबाई शिखर सर करणे शक्य असल्याने निफाड तालुक्यातील शिवडी येथील सात वर्षांच्या युवराज निलेश सांगळे याने पावसाळी वातावरणातील सकाळच्या थंड अशा प्रतिकुल परीस्थितीवर मात करत अवघ्या ३:३० तासात शिखर केल्याने त्याच्यावर अभिनंदनाचा वर्षाव होत असून वेड सह्याद्रीचे सह्याद्री ट्रेक अड



अडव्हेंचर ग्रुपच्या माध्यमातून या मोहिमेत ४ गिर्यारोहक सहभागी झाले होते. या ग्रुपच्या माध्यमातून दरवर्षी तीन चार वेळा मोहिमा आयोजित केल्या जातात. दिवाळी ते मे अखेर या कालावधीत या मोहिमा होतात. यंदा कालच्या रविवारी या ग्रुपची मोहीम पार पडली यामध्ये उगाव येथील मधुकर आव्हाड व नामदेव खेडकर यांच्या मार्गदर्शनाखाली निलेश सांगळे हे आपल्या सात वर्षांच्या युवराज सांगळे या मुलाला घेऊन सहभागी झाले होते. पावसाची तीव्रता लक्षात घेऊन रविवारी ३१ मे रोजी पहाटे तीन वाजता या मोहिमेला पायथ्याच्या मंदिरापासून सुरवात झाली. ३ तास ३५ मिनिटात मोहीम फत्ते झाल्यावर आनंद व्यक्त केला गेला. शिखरावर कळसुबाई देवीचे एक छोटे मंदिर आहे देवीची अशी आख्यायिका सांगितली जाते की कळसुबाई तेथील गावातील सुन होती. आणि तिला ब-यापैकी औषधी वनस्पतीची माहिती होती. त्यामुळे ती औषधी आणून गावकऱ्यांना बरे करायची. कालांतराने तीच्या मृत्यू नंतर गावातील लोकांनी तिची स्मृती अजरामर रहावी म्हणून या शिखराला तिचे नाव देण्यात आले असून कळसूबाईच्या नावाने मंदिर ही बांधले आहे. येथून जवळच भंडारदरा धरण असून रंधा धबधबा कोकणकडा इत्यादी प्रेक्षणीय स्थळे असल्याने दूरवरून गिर्यारोहक पर्यटक येत असतात. या गिर्यारोहकांवर सर्वत्र अभिनंदनाचा वर्षाव होत असून निफाड पंचक्रोशीतील ग्रामस्थानी शुभेच्छा दिल्या आहेत.

# घारापुरी लेणी येथे ४४ कोटी खर्चून उभारणार अध्ययावत जेट्टी.

**दैनिक युवक आधार**
**तृप्ती भोईर उरण /प्रतिनिधी**
घारापुरी किंवा एलिफंटा लेणी या महाराष्ट्रामधील मुंबईपासून ६-७ मैल अंतरावर समुद्रातील घारापुरी व लहान बेटावर डोंगरात कोरलेल्या लेण्या आहेत .ह्या लेण्या भव्य आकाराच्या शिल्पांसाठी प्रसिद्ध आहेत .भारतात असलेल्या बाराशे पेक्षा अधिक लेण्यांपैकी फक्त घारापुरी लेणी समुह भर समुद्रात असलेल्या घारापुरी बेटावर आहेत. मोराबंदर, राजबंदर व शेत बंदर अशी तीन छोटी छोटी खेडी या बेटावर वास्तव्य करून आहेत. अशा या जगप्रसिद्ध एलिफंटा बेटावरील पर्यटकांच्या दिवसेंदिवस वाढत्या गर्दीचा ताण कमी करण्यासाठी शेत बंदर येथील जुन्या जेटीला जोडून ८८कोटी रुपये खर्चून १० मीटर रुंदची अध्ययावत नवीन जेटी उभारण्यात येणार आहे .पुरातत्त्व विभागाच्या मान्यतेनंतर त्वरित या कामाला सुरुवात केली जाणार आहे.

एलिफंटा बेटावरील काळ्या दगडात कोरलेल्या अद्‌भुत लेण्यांचा जागतिक



ऐतिहासिक वारशामध्ये समावेश आहे. शंकराची विविध रूपे असलेल्या या अतिसुंदर जगप्रसिद्ध लेण्या पाहण्यासाठी वर्षभरात जगभरातून सुमारे २०लाखाहून अधिक पर्यटक हजेरी लावतात. यामध्ये दरवर्षी वाढ होत असली तरी पर्यटकांना देण्यात येणाऱ्या सोयी सुविधांचा मात्र मोठ्या प्रमाणात अभाव दिसून येत आहे. गेटवे ऑफ इंडिया येथून पर्यटकांना घेऊन लाँचेस बेटावरील शेतबंदर जेटी वर येतात .सध्या पर्यटकांना चढ-उतार करण्यासाठी ४ मीटर रुंदीची जेटी आहे.आणि याच मार्गावरून मिनी ट्रेन देखील धावत असल्याने पर्यटकांना चालण्यासाठी जुनी जेट्टी अरुंद असल्याने त्रासदायक ठरत आहे. तसेच या जेट्टी पासून लेण्यांच्या पायऱ्यांपर्यंत असलेले सुमारे एक किलोमीटर अंतरापर्यंत जाण्यासाठी देशी-विदेशी पर्यटकांसाठी फारसे आवश्यक सुविधा उपलब्ध नाहीत.

पर्यटकांची ही गैरसोय लक्षात घेऊन महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाने सागरमाला योजनेतून शेत बंदर येथील जुन्या जेटीचे मजबुतीकरण व चार मीटर रुंदीची जुन्या जेटी ला जोडून सुमारे ८८ कोटी रुपये खर्च करून १० मीटर रुंदीची अध्ययावत नवीन जेटी उभारण्याची योजना आखली आहे. त्यामुळे रस्त्यात पर्यटकांना ये-जा करणे सुलभ होणार आहे. याशिवाय देशी विदेशी पर्यटकांसाठी उठ-बस करण्यासाठी शेड बैठक व्यवस्था उभारण्यात येणार आहे.नवीन जेट्टी चे काम होण्यासाठी पुरातत्व विभागाच्या मंजुरीचे काम अंतिम टप्प्यात असून ती मिळताच काम सुरू होणार आहे. अशी माहिती महाराष्ट्र मेरीटाईम बोर्डाचे कार्यकारी अभियंता सुधीर देवरे यांनी दिली.